# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२२-२३

# मराठी भाषा विभाग

# अनुक्रमणिका


| कार्यक्रमाचा क्रमांक | कार्यक्रमाचे नाव | | | पृष्ठे |
|---|---|---|---|---|
| १. | प्रस्तावना | .. | .. | ३ |
| २. | मराठी भाषा विभाग, मंत्रालय | .. | .. | ५-१२ |
| ३. | भाषा संचालनालय | .. | .. | १३-२० |
| ४. | राज्य मराठी विकास संस्था | .. | .. | २१-३० |
| ५. | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ | .. | .. | ३१-३३ |
| ६. | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ | .. | .. | ३४-३६ |

**कार्यक्रम क्रमांक-१**

**प्रस्तावना**

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये “मराठी भाषा विभाग”असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग शासन अधिसूचना ,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी-२०१२/१०८/१८ (र. व. का.), दिनांक २९.११.२०१० अन्वये निर्माण करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अखत्यारित असलेले मराठी भाषेशी संबंधित विषय, तसेच मराठी भाषाविषयक कामकाज हाताळणारी खालील कार्यालये / संस्था / मंडळे मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आली आहेत.

१. भाषा संचालनालय,
२. राज्य मराठी विकास संस्था,
३. महाराष्ट्र राज्य साहित्यआणि संस्कृती मंडळ आणि
४. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

वित्तीय आवश्यकता

(ii) Financial requirements

(रक्कम रुपये लाखात)

| | **अर्थसंकल्प २०२१-२२ Budget २०२१-२२** | | | **सुधारित अंदाज २०२१-२२ Revised Estimates २०२१-२२** | | | **अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३ Budget Estimates २०२२-२३** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Committed** | **Scheme** | **Total** | **Committed** | **Scheme** | **Total** | **Committed** | **Scheme** | **Total** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** |
| **(अ) कार्यालयनिहाय तरतुदी** | | | | | | | | | |
| (१) मराठी भाषा विभाग (खुद्द) | ६२२.६१ | १३५१.०० | १९७३.६१ | ४८२.२३ | १६३५.७५ | २११७.९८ | ५४७.७५ | ३६९६.०० | ४२४३.७५ |
| (२) भाषा संचालनालय | ८८८.७७ | ०० | ८८८.७७ | ८२५.५१ | ०० | ८२५.५१ | ९५४.२९ | ०० | ९५४.२९ |
| (३) राज्य मराठी विकास संस्था | १८४.८८ | ११७१.९१ | १३५६.७९ | १७१.७६ | ७०३.१४ | ८७४.९० | २१७.३६ | १०००.०० | १२१७.३६ |
| (४) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ | २०२.७६ | ३६४.०० | ५६६.७६ | १९७.६० | २८९.९० | ४८७.५० | २५३.८० | ४०४.०० | ६५७.८० |
| (५) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ | २७१.२२ | १००.०० | ३७१.२२ | २५२.६२ | ५०.०० | ३०२.६२ | २९४.१३ | १००.०० | ३९४.१३ |
| **एकूण (अ)** | **२१७०.२४** | **२९८६.९१** | **५१५७.१५** | **१९२९.७२** | **२६७८.७९** | **४६०८.५१** | **२२६७.३३** | **५२००.००** | **७४६७.३३** |
| | | | | | | | | | |
| (१) ठेव संलग्न विमा योजना | २.४० | ०० | २.४० | २.४० | ०० | २.४० | २.४० | ०० | २.४० |
| (२) शासकीय कर्मचा-यांना प्रदाने | ४७.६१ | ०० | ४७.६१ | ४७.३६ | ०० | ४७.३६ | १२२.६१ | ०० | १२२.६१ |
| **एकूण (ब)** | **५०.०१** | **००** | **५०.०१** | **४९.७६** | **०** | **४९.७६** | **१२५.०१** | **०** | **१२५.०१** |
| **एकूण (अ+ब)** | **२२२०.२५** | **२९८६.९१** | **५२०७.१६** | **१९७९.४८** | **२६७८.७९** | **४६५८.२७** | **२३९२.३४** | **५२००.००** | **७५९२.३४** |

## कार्यक्रम क्रमांक-२

## मराठी भाषा विभाग, मंत्रालय

मराठी भाषा विभागातील पदे भरण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठीत करण्यात आली असून या समितीने मराठी भाषा विभागासाठी मंत्रालय स्तरावर टप्प्या-टप्प्याने विविध संवर्गातील एकूण ४६ पदांना मंजुरी दिली आहे.

### (१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे :-

भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात केंद्र शासनाकडून कार्यवाही केली जाते. अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाने कळविलेल्या निकषांच्या अनुषंगाने मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी पात्र ठरते किंवा कसे, याबाबतचा अभ्यास करून केंद्र शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यासाठी राज्य शासनाने प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली भाषा तज्ज्ञांची एक समिती दि.१० जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयानुसार स्थापन केली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबतचा परिपूर्ण अहवाल शासनाने दि.१२ जुलै, २०१३ रोजी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे पाठविला आहे. तसेच सदर अहवालाची इंग्रजी प्रत दि.१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे पाठविण्यात आली आहे.

मराठी भाषा ही अभिजात भाषेसंबंधीचे केंद्र शासनाने विहित केलेले सर्व निकष पूर्ण करीत असल्याने, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा याबाबत शासनाकडून सचिव / प्रधान सचिव, मा.मुख्य सचिव, मा.मंत्री व मा. मुख्यमंत्री यांचे स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

सदर प्रस्तावाची वस्तुस्थिती केंद्र शासनाच्या दि.२० ऑक्टोबर, २०२० च्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे. सदर पत्रात नमूद केल्यानुसार राज्य शासनाचा प्रस्ताव अन्य मंत्रालये व साहित्य अकादमीच्या भाषा तज्ज्ञ समितीकडे विचाराधीन आहे. तसेच, फेब्रुवारी २०२० मध्ये साहित्य अकादमीच्या तज्ज्ञ समितीची "विविध भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देणेबाबतच्या निकषांचे पुनर्विलोकन करण्यासाठी तसेच पुनर्विलोकित निकषांनुसार किती भाषा अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी पात्र आहेत हे शोधण्यासाठी" बैठक झाली. मात्र, या बैठकीमध्ये अभिजात भाषेच्या निकषांसंदर्भात तसेच या निकषांनुसार अभिजात ठरणाऱ्या भाषांच्या यादीबाबत अंतिम निर्णय झाला नाही. या संदर्भात, लवकरच बैठक घेण्याबाबत संस्कृती मंत्रालयाने साहित्य अकादमीस सूचना केली आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दि.०८ जून, २०२१ रोजी मा. पंतप्रधान महोदयांची प्रत्यक्ष भेट घेऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकरात लवकर देण्याबाबत विनंती केली आहे. तसेच या संदर्भात दि.०७ जून,२०२१ रोजीचे पत्र मा.पंतप्रधान महोदयांना अग्रेषित करण्यात आले आहे. तसेच मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या स्वाक्षरीने दि.११ फेब्रुवारी, २०२१ च्या पत्रान्वये मराठी भाषेला लवकरात लवकर अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील जनतेकडून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा याकरिता जनमोहिम राबवून महामहिम राष्ट्रपती महोदयांना १,२०,००० (एक लाख वीस हजार) पेक्षा अधिक वैयक्तिक पत्रांद्वारे विनंती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत मा.मंत्री, मराठी भाषा यांचे अध्यक्षतेखालील शिष्टमंडळाने दि.२१ फेब्रुवारी, २०२२ रोजी मा. मंत्री, श्री.जी.किशन रेड्डी, संस्कृती मंत्रालय, भारत सरकर यांची दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर करण्याबाबत केंद्र शासनास विनंती केली.

**(२) प्रशासनिक व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढविणे :-**

दिनांक १ मे १९६० रोजी जेव्हा महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा शासनाने शक्य तितक्या लवकर इंग्रजीऐवजी मराठीतूनच राज्यकारभार करण्याचे धोरण जाहीर केले. त्यानुसार, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये दिनांक २६ जानेवारी, १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली व महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगिकार करण्यात आला. तद्नंतर, "महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम, १९६६," च्या अधिसूचनेन्वये दिनांक १ मे, १९६६ पासून "वर्जित प्रयोजने" वगळता सर्व शासकीय प्रयोजने मराठीतून करणे अनिवार्य करण्यात आले. यामध्ये नमूद करण्यात आलेली "वर्जित प्रयोजने" सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे आहेत:-

१. केंद्र शासन व केंद्रीय कार्यालये यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार

२. अन्य राज्यांशी करण्यात येणारा पत्रव्यवहार

३. परराष्ट्रांचे दूतावास यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार

४. महालेखापाल कार्यालयाशी करण्यात येणारा पत्रव्यवहार तसेच त्यांच्याकडे द्यावयाचे लेखे

५. न्यायालयीन व विधी विषयक बाबी

६. वैद्यकीय औषधी योजना, अहवाल आणि वैद्यकीय अहवालातील तांत्रिक बाबी

**शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ व्हावे म्हणून शासनाने खालील उपाययोजना केलेली आहे:-**

(१) शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने, आवश्यक असलेल्या भाषिक क्षमता व कौशल्ये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांनी प्राप्त करणे आवश्यक आहे. यासाठी एतदर्थ मंडळाकडून मराठी भाषा परीक्षा घेण्यात येते. इंग्रजी लघुलेखक/लघुटंकलेखक/टंकलेखक/लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी एतदर्थ मंडळाच्या मराठी लघुलेखन/टंकलेखन परीक्षा तसेच केंद्रीय कामकाजाची भाषा हिंदी असल्यामुळे एतदर्थ मंडळामार्फत हिंदी भाषा परीक्षा घेण्यात येते.

या परीक्षा सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत या परीक्षा उत्तीर्ण न होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत रोखल्या जातात.

(२) विभागाच्या अधिनस्त असलेल्या भाषा संचालनालयामार्फत प्रमाण नमुने, सर्वसाधारण नमुने व विशेष नमुने, संक्षिप्त शेऱ्यांची पुस्तिका उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच, शासकीय कर्मचाऱ्यांना मराठीतून टिपण्या व पत्रव्यवहार करणे सुलभ व्हावे या उद्देशाने प्रशासनिक लेखनाला उपयुक्त होईल असे साहित्य, पुस्तके, शुध्दलेखन नियमावली, विविध परिभाषा कोश, शब्दावल्या तयार करण्यात येऊन त्यांच्या प्रती शासकीय कार्यालयांना पुरविण्यात आल्या आहेत. तसेच, प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा प्रभावी वापर होण्यासाठी भाषा संचालनालयाने यापैकी बहुतेक माहिती भ्रमणध्वनी उपयोजकावरदेखील उपलब्ध केली आहे.

**(३) मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र स्थापन करणे :-**

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक धोरणानुसार मराठी भाषेचा विकास, संवर्धन, जतन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने सन २०१० पासून स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या विभागाच्या अखत्यारीत असलेली ४ क्षेत्रीय कार्यालये मुंबईत विविध ठिकाणी कार्यान्वीत असून या कार्यालयांचा आपापसात समन्वय साधण्यासाठी ही कार्यालये

एकाच इमारतीत असण्याची आवश्यकता विचारात घेऊन मराठी भाषा विभागाच्या निर्मितीनंतर राज्याचे सांस्कृतिक धोरण-२०१० मध्ये शिफारस केलेले "मराठी भाषा भवन" उभारण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१४ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मराठी भाषा भवन मुख्य केंद्र दक्षिण मुंबई किंवा वांद्रे-कुर्ला परिसरामध्ये व उपकेंद्र ऐरोली, नवी मुंबई येथे उभारण्यास मान्यता देण्यात आली. या संदर्भात दि.०५ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात आले.

**मराठी भाषा भवन मुख्य केंद्र** : दि.२४ मार्च, २०२१ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने महसूल व वन विभागाने त्यांच्या दि.१२ जुलै,२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठी भाषा भवन मुख्य केंद्र उभारण्याकरीता गिरगाव महसूल विभागातील भूकर क्र.१७३६ एकूण क्षेत्रफळ ३२१७.४२ चौ.मी. या क्षेत्रापैकी शालेय शिक्षण विभागाचे बांधकाम वगळून उर्वरित १५५५ चौ.मी. क्षेत्रफळ तसेच याच मिळकतीमधील झोपडपट्टी अतिक्रमणाखाली असलेले ५५० चौ.मी. क्षेत्र (प्रत्यक्षात ५३० चौ.मी.) असे **एकूण २१०५चौ.मी. (प्रत्यक्षात २०८५ चौ.मी.) इतके क्षेत्र** मराठी भाषा विभागास महसूल मुक्त व भोगवटा मुल्यरहित तत्त्वावर हस्तांतरित करण्यास मान्यता दिली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयाने दि.१४ जुलै, २०२१ रोजीच्या ताबा पावतीन्वये सदर जागेचा ताबा मराठी भाषा विभागास दिला आहे.

तसेच मराठी भाषा भवन उपकेंद्राप्रमाणेच मराठी भाषा भवन मुख्य केंद्राचे बांधकाम देखील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करून घेण्यात येणार असून वास्तूविशारद म्हणून मे.पी.के.दास अँड असोसिएट्स या कंपनीची निवड करण्यात आली आहे.

**मराठी भाषा भवन उपकेंद्र** : दि.०५ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये व या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या विविध समित्या / मंडळे / उपक्रम यांच्या कामकाजाकरीता सिडको महामंडळाकडून ६० वर्षांकरीता भूखंड क्र. ६अ, सेक्टर क्र.१३, ऐरोली, नवी मुंबई, एकूण क्षेत्रफळ ३०१८.७२ चौ.मी. नोंदणीकृत भाडेपट्टीने रू.५.९० कोटी इतके शुल्क अदा करून संपादित करण्यात आला आहे. दि.१६ जुलै,२०२१ रोजी सदर संपादित भूखंडाच्या दीर्घकालीन भाडेपट्टीचा करारनामा करण्यात आला आहे. प्रस्तावित "मराठी भाषा भवन उपकेंद्र" या इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करून घेण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याने सदर भूखंडाचा ताबा पुढील कार्यवाहीसाठी सिडको महामंडळाकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना देण्यात आला आहे.

मराठी भाषा भवन उपकेंद्राचे सुधारित बांधकाम आराखडे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सादर केलेल्या ढोबळ अंदाजपत्रकाची शासन स्तरावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक छाननी करण्यात आली व सार्वजनिक बांधकाम विभागाने सुधारित परिगणना करून रू.२४,९७,७९,०४४/- (अक्षरी रूपये चोवीस कोटी सत्यान्नव लक्ष एकोणांशी हजार चव्वेचाळीस फक्त) इतक्या ढोबळ अंदाजपत्रकास दि.०३ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहमती दिलेली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत प्रस्तावित मराठी भाषा भवन उपकेंद्राचे बांधकाम आराखड्याचे सविस्तर अंदाजपत्रकास मान्यतेबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्तावास मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची दि.०७ जानेवारी, २०२२ रोजी तत्वत: मान्यता मिळाली आहे.

(४) **<u>मराठी भाषा धोरण</u>** :- महाराष्ट्र शासनाने दि.२२ जून, २०१० च्या शासन निर्णयान्वये राज्याचे राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी कायमस्वरूपी भाषा सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली. सदरहू समितीची वेळोवळी पुनर्रचना करण्यात आली.

महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षांतील मराठी भाषेचे धोरण ठरविण्यासाठी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन समितीने तयार केलेला मसुदा विचारात घेऊन डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेला सुधारित मसुदा भाषा संचालनालयाने शासनास सादर केला.

सदर मसुद्यात तत्कालीन मा. मंत्री (मराठी भाषा) यांनी सुचविलेल्या सुधारणा. "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,२०२०" च्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय, इतर मंत्रालयीन विभागांचे अभिप्राय व विद्यमान भाषा सल्लागार समितीचे मत विचारात घेऊन मराठी भाषा धोरणाच्या मसुद्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येतील. सदर मराठी भाषा धोरणाचा सुधारित मसुदा मा.मंत्री, मराठी भाषा यांचे मान्यतेस्तव सादर करण्यात येईल.

**(५) विधानमंडळ मराठी भाषा समिती :-** महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये "मराठी" ही शासन व्यवहारासाठी राजभाषा म्हणून स्विकारण्यात आली आहे. सर्व क्षेत्रात राज्यातील राज्य शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा सक्षमपणे वापर करणे हे शासनाचे धोरण आहे. या धोरणाचा काटेकोरपणे अवलंब व्हावा व मराठी भाषेच्या वापरा संबंधी सर्व राज्य शासकीय / निमशासकीय कार्यालयांच्या कामाचा आढावा घेतला जावा या उद्देशाने राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा समावेश असलेली, "संयुक्त विधिमंडळ मराठी भाषा समिती" स्थापन करण्यात आली आहे. या समितीकडून राज्यातील शासकीय कार्यालयांचा व स्थानिक्र संस्थांच्या कामाचा आढावा घेण्यात येतो व प्रशासनाच्या कामात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा, यादृष्टीने समितीकडून विविध सूचना व उपाययोजना सुचविण्यात येतात.

**(६) <u>आंतरराष्ट्रीय मराठी मंच स्थापन करणे</u>** -

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करणे हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. या धोरणास अनुसरुन अनेक उपक्रम या विभागामार्फत राबविण्यात येतात. तथापि, परदेशातील मराठी भाषिक व्यक्तींना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध नसल्यामुळे मराठी भाषेसंदर्भात विविध उपक्रम राबविता येत नाहीत. ही बाब विचारात घेऊन यावर्षी आंतरराष्ट्रीय मराठी मंच ची स्थापना करण्यात येत आहे. या माध्यमातून मराठी भाषेचा प्रचार व प्रसार आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्याचे प्रस्तावित आहे.

**(७) <u>मराठी भाषा संवर्धनाकरिता विविध वार्षिक उपक्रम</u> :-**

**(अ) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** :- मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करुन वृध्दींगत करण्यासाठी दरवर्षी दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणुन साजरा करण्यात येतो. सदर "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" सन २०२१ पासून दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा करण्याचा निर्णय शासन निर्णय क्र. मभापं-२०१९/प्र.क्र.१११/भाषा-२, दिनांक १८ सप्टेंबर, २०२० अन्वये घेण्यात आला आहे. या कालावधीत शाळा, महाविद्यालये यांच्या सहभागाबरोबरच सर्व प्रशासनिक विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम, राज्यातील सर्व केंद्रीय कार्यालये, बँका, वाणिज्य संस्था इत्यादी कार्यालयांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

**(आ) मराठी भाषा गौरवदिन (दिनांक २७ फेब्रुवारी):** ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून आणि त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून शासन निर्णय क्र.मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दिनांक २१ जानेवारी, २०१३ अन्वये दिनांक २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिन राज्यभर "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयास अनुसरुन सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इत्यादि कार्यालयांनी समारंभपूर्वक "मराठी भाषा गौरव दिन" सोहळा साजरा करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

शासनातर्फे या दिवशी (१) मराठी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकास **विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार**, (२) उत्कृष्ट प्रकाशन संस्थेस **श्री. पु. भागवत पुरस्कार**, मराठी भाषा संवर्धनासाठी मोलाचे योगदान देणा-या व्यक्तीस अथवा संस्थेस (३)आंतरराष्ट्रीय किर्तीचे ज्येष्ठ भाषा वैज्ञानिक आणि साहित्य समीक्षक डॉ.अशोक केळकर यांच्या नावे "**मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार**" २ पुरस्कार(व्यक्ती व संस्था)) व (४) कवितेच्या माध्यमातून भाषा संवर्धनाचे कार्य करणा-या कवीवर्य मंगेश पाडगांवकर यांच्या नावे **"मराठी भाषा संवर्धक पुरस्कार"** २ पुरस्कार (व्यक्ती व संस्था)असे पुरस्कार त्याचप्रमाणे (५) उत्कृष्ट मराठी वाङमय निर्मितीस "स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङमय पुरस्कार" (३५ पुरस्कार) या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

**(इ) वाचन प्रेरणा दिन (दिनांक १५ ऑक्टोबर)** :- माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दिंगत करण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी "वाचन प्रेरणा दिन" साजरा करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

**८. <u>पुस्तकांचे गाव या योजनेचा विस्तार करणेबाबत :</u>**

प्रत्येक जिल्हयाला पुस्तकाचे गाव या योजनेचा लाभ देण्याकरीता मा. मुख्यमंत्री यांनी प्रत्येक जिल्हयात पुस्तकाचे गाव निर्माण करण्याबाबत घोषणा केली आहे. पुस्तकाचे गाव भिलार हा राज्य मराठी विकास संस्थेअंतर्गत स्वतंत्र प्रकल्प व मनुष्यबळ या दोन बाबी भिलार गावापूरत्या मर्यादित ठेवून, लोक सहभागातून पुस्तकाचे गाव योजनेचा विस्तार करण्याचे अनुषंगाने प्रत्येक जिल्हयात पुस्तकांचे गाव निर्माण करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन शासन निर्णय दि. ४ जानेवारी, २०२२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१) "पुस्तकांचे गाव, भिलार" ही योजना राज्य मराठी विकास संस्थेच्या स्तरावर स्वतंत्रपणे उपक्रम म्हणून राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२) सदर योजनेची व्यापकता वाढविण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यात एक पुस्तकांचे गाव सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

३) पुस्तकांचे गाव ही योजना विस्तारीत स्वरूपात सुरु करताना पहिल्या टप्प्यात पुस्तकाचे गाव विभागीय स्तरावर सहा महसुली विभागात सुरु करण्यास करण्यास मान्यता देण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यात जिल्हास्तरावर प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकाचे गाव सुरु करण्यास मान्यता मान्यता देण्यात आली आहे

४) पुस्तकांचे गाव या विस्तारीत योजनेत ३५ जिल्हयाचा समावेश करण्यात येऊन सदर योजनेची तरतूद (२२०५३६५३) -३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल. पुस्तकांचे गाव ही योजना विस्तारीत स्वरुपात सुरु करण्यासाठी येणाऱ्या वार्षिक अनावर्ती रु. १७.५० कोटी तथा वार्षिक आवर्ती रु. २.२९ कोटी अशा एकूण वार्षिक रु.१९.७९ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली .

५) शासनाच्या अटी व शर्ती तथा विहित कार्यपध्दती नुसार आर्थिक वर्षाच्या सुरवातीला अर्ज मागविण्यात येतील. राज्य मराठी विकास संस्थेकडून संबंधित संस्थांची तपासणी करण्यात येऊन या बाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

**मराठी भाषा विभागाची माहिती https://marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

----------------

**विभागाची संरचना**

मंत्री

↓

प्रधान सचिव/सचिव

↓

सह सचिव/उपसचिव

↓

अवर सचिव (आस्थापना)
- कक्ष अधिकारी (आस्था-१)
- कक्ष अधिकारी (आस्था-२)
- कक्ष अधिकारी (रोख शाखा)

अवर सचिव (गृह व्यवस्थापन)
- कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा)
- कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प)

अवर सचिव (भाषा)
- कक्ष अधिकारी (भाषा-१)
- कक्ष अधिकारी (भाषा-२)
- कक्ष अधिकारी (भाषा-३)

# मराठी भाषा विभाग

## कर्मचारी विषयक गोषवारा

Personnel Summary

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी Scale of Pay | पदसंख्या | Designation |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | **(अ) राजपत्रित** (A) Gazetted | | | |
| १ | प्रधान सचिव/सचिव | संवर्ग पद (भा.प्र.से) | १ | Pr. Secretary/Secretary |
| २ | सह सचिव/उप सचिव | एस-२७ : ११८५००-२१४१००<br>एस-२५ : ७८८००-२०९२०० | १ | Joint Secretary/<br>Deputy Secretary |
| ३ | अवर सचिव | एस-२३ : ६७७००-२०८७०० | ३ | Under Secretary |
| ४ | कक्ष अधिकारी | एस-१७ : ४७६००-१५११०० | ८ | Section Officer |
| | | **एकूण (अ)** | **१३** | Total (A) |
| | **(ब) अराजपत्रित** (B)Non-Gazetted | | | |
| १ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ३ | Stenographer (H.G.) |
| २ | सहायक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ८ | Assistant |
| ३ | रोखलेखापाल | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Cash Accountant |
| ४ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Stenographer (L.G.) |
| ५ | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | १० | Clerk-cum-Typist |
| ६ | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Driver |
| | | **एकूण (ब)** | **२५** | Total (B) |
| **(क) अराजपत्रित (वर्ग-४)** (C) Non-Gazetted (Class-IV) | | | | |
| १ | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | ८ | Peon |
| | | **एकूण (क)** | **८** | Total (C) |
| | **एकूण (अ+ब+क)** | | **४६** | Grand Total (A+B+C) |

## कार्यक्रम क्रमांक ३

## भाषा संचालनालय

शासन व्यवहारात मराठीचा वापर या शासनाच्या प्रतिज्ञाबद्ध धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेचे काम मुख्यत: भाषा संचालनालयाचे असून त्यासाठी हे संचालनालय खालील प्रकारची कामे पार पाडते :-

**(१) राज्य कायदे व नियमांचे मराठीकरण** :-

सन २०२०-२१ या वर्षात मराठीकरण केलेले काही ठळक राज्य नियम पुढीलप्रमाणे आहेत:-

१) कोवीड-१९ निर्बंध शिथिल करण्याबाबतचे विविध आदेश

२) आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या विविध पाठ्यक्रमाच्या प्रवेशाचे नियम

३) सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत दंत सहायक गट-ड पदाचे सुधारित सेवा प्रवेश नियम

४) सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (सुधारणा) नियम, २०२१

५) महाराष्ट्र जिल्हा ग्राम विकास निधी (सुधारणा) नियम, २०२१

६) महाराष्ट्र कृषी उत्पन्न, पणन (विकास व विनियमन) नियम, २०२०

७) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम

८) अधीक्षक, सहाय्यक संशोधन अधिकारी व सहाय्यक दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन यांचे सेवा प्रवेश नियम

**(२) राज्य कायद्यांचे अद्ययावतीकरण :**

राज्य विधानमंडळाने केलेल्या सुधारणा अधिनियमांतील तरतुदींचा समावेश करून मूळ राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करण्याचे व ते पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करण्याचे काम डिसेंबर, १९८३ पासून भाषा संचालनालयाद्वारे केले जाते. यामध्ये पुढील कामांचा समावेश होतो:-

अ) राज्य विधानमंडळाने सुधारणा अधिनियमांन्वये मूळ कायद्यांमध्ये केलेल्या सुधारणा समाविष्ट करणे.

ब) अद्ययावत स्वरूपात राज्य अधिनियम पुनर्मुद्रित प्रतीच्या (रिप्रिंटच्या) स्वरूपात प्रसिद्ध करणे.

क) राज्य अधिनियमांचे एकत्रीकरण करून महाराष्ट्र अधिनियम संहिता या स्वरूपात प्रसिद्ध करणे.

ड) राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करून त्यांची पुस्तक स्वरूपात छपाई करणे व ते भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करणे.

२५३ राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करून ते पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करून व संकेत स्थळावर अपलोड केलेले आहेत. तथापि, नवीन राज्य अधिनियमांच्या निर्मितीबरोबरच मूळ कायद्यामध्ये सुधारणा करण्याचे काम राज्य विधानमंडळात सतत चालू असल्याने अद्ययावतीकरण करून पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध केलेल्या पूर्वीच्या राज्य अधिनियमांमध्ये सुधारणा करून त्यांचे पुन्हा अद्ययावतीकरण करण्याची प्रक्रिया करण्यात येते. त्यानुसार, सन २०२०-२१ या वर्षात ९ राज्य अधिनियमांचे नव्याने अद्ययावतीकरण करण्यात आले आहे. १६ राज्य अधिनियम तपासून मुद्रितांसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविलेले आहेत. १३ राज्य अधिनियम अंतिम छपाईसाठी पाठविले आहेत. त्यापैकी ३ राज्य अधिनियम पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध झाले आहेत.

**(३) भारताचे संविधान व केंद्रीय अधिनियमांचे मराठीकरण :**

प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ अन्वये केंद्रीय अधिनियमांचा मराठी अनुवाद करून ते प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात प्रसिध्द करण्याचे भारताच्या संविधानाचा अनुवाद करून ते प्रसिद्ध करण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

केंद्रीय अधिनियमांचे मराठीकरण करून ते प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया :-

१) केंद्रीय अधिनियमांचा अनुवाद करणे, अनुवाद तपासणे, सुधारणा बसविणे व मुद्रित वाचन करणे.

२) भारत सरकारच्या विधि व न्याय मंत्रालयांतर्गत येणाऱ्या राजभाषा खंडाकडून केंद्रीय अधिनियमांच्या केलेल्या मराठी अनुवादाची विधीक्षा करवून घेणे.

३) भारत सरकारच्या विधि व न्याय मंत्रालयाच्या राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाच्या बैठकीत केंद्रीय अधिनियमांच्या मराठी अनुवादास मान्यता घेणे.

४) मा. राष्ट्रपतींच्या अनुमतीने भारताच्या राजपत्रात केंद्रीय अधिनियम प्रसिध्द करणे.

**(अ) भारताचे संविधान**: भारताच्या संविधानाचा मराठी अनुवाद करून मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेने ते प्रसिद्ध केले असून त्यात वेळोवेळी सुधारणा समाविष्ट करुन आतापर्यंत भारताच्या संविधानाच्या सात आवृत्त्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून त्यापैकी सहा आवृत्त्या मराठीत आहेत व सातवी द्विभाषी आवृत्ती प्रसिद्ध करण्यात आली आहे. ९९ वी, १०० वी, १०१ वी, १०२ वी, १०३ व, १०४ वी संविधान सुधारणा अधिनियमातील सुधारणा समाविष्ट करुन भारताचे संविधान याची आठवी द्विभाषी आवृती प्रसिद्ध करण्याची कार्यवाही चालू आहे. विधि व न्याय मंत्रालयाच्या सूचनेनुसार ९९ वी ते १०४ वी संविधान सुधारणा अधिनियमांचा मराठी अनुवाद करुन राजभाषा खंडाच्या मान्यतेने सातव्या आवृत्ती सोबत संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहेत.

**(ब) केंद्रीय अधिनियम**:- आतापर्यंत ३७७ केंद्रीय अधिनियमांना भारत सरकारच्या राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाची मान्यता घेण्यात आली असून त्यापैकी मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेने १८४ केंद्रीय अधिनियम प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात, ३९ केंद्रीय अधिनियम प्राधिकृत अनुवादाच्या स्वरुपात प्रसिद्ध झाले आहेत. तसेच १२ केंद्रीय अधिनियम राजपत्रात प्रसिद्ध केले असून ते प्राधिकृत पाठाच्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यासाठी पाठविले आहेत. तसेच उर्वरित १४२ केंद्रीय अधिनियम त्या त्या टप्प्यावर प्रक्रियेधीन आहेत.

**(४) न्यायनिर्णयांचे मराठीकरण :-**

अ) न्यायालयीन व्यवहारात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने, भारतीय विधि प्रतिवृत्तातील (All India Law Report) मा. उच्च न्यायालयाच्या व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निवडक न्यायनिर्णयांचा मराठीत अनुवाद करणे व न्यायनिर्णय पत्रिकेच्या स्वरूपात प्रसिद्ध करणे.

ब) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४१ अन्वये मा. उच्च न्यायालयांच्या व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयास कायद्याचा दर्जा असल्याने, हे काम न्याय व्यवहारात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

क) पुरेशा मनुष्यबळाअभावी न्यायनिर्णयांचे मराठीकरण करण्याचे काम सध्या थांबलेले आहे.

**(५) नियमपुस्तिका आणि प्रमाण नमुने व प्रपत्रे यांचे मराठीकरण : -**

अ) शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने, मंत्रालयीन विभाग व शासकीय कार्यालयांद्वारे वापरल्या जाणाऱ्या नियमपुस्तिका (Manuals) आणि विशेष व प्रमाण नमुने आणि प्रपत्रे यांचा मराठीत अनुवाद करून देण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

ब) भाषा संचालनालयाने सन २०२०-२१ मध्ये माहे एप्रिल २०२० ते नोव्हेंबर २०२० या कालावधीत भारतातील अन्न सुरक्षितता आणि मानके प्राधिकरण, कौशल्य विकास विभागाचे मार्गदर्शक तत्वे, स्वच्छ भारत अभियान, २०२० या प्रकरणांचा अनुवाद व अनुवाद तपासणी करुन दिली. एकूण फोलियो ११०५८ इतके आहेत व सन २०२१-२२ या वर्षात सुमारे १५,५०० फोलिओ होईल असा अंदाज आहे व सन २०२२-२०२३ ची अंदाजित संख्या १४००० फोलिओ असेल.

**(६) प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचे मराठीकरण: -**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६५ अन्वये शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० टक्के वापर करण्याच्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, सर्व मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांसह पुढील प्रकरणांचा मराठीत अनुवाद करण्याचे व अनुवाद तपासणीचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

अ) केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या विविध योजना व कार्यक्रम.

ब) केंद्र सरकारची व राज्य शासनाची धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे.

क) मंत्रालयीन विभागांची अन्य प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणे.

ड) विविध चौकशी समित्यांच्या व अभ्यास समित्यांचे अहवाल व कृती अहवाल.

ई) भारतीय निवडणूक आयोगाचे निदेश, आदेश, नियम, आचार संहिता व नियम पुस्तिका.

फ) मा. राज्यपालांचे निदेश व आदेश.

सन २०२०-२१ या वर्षात विविध मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करुन दिलेला आहे. अलिकडील काळामध्ये मराठीकरण केलेली काही ठळक प्रशासकीय प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

१) स्वामित्व योजना अंमलबजावणी चौकट – मार्गदर्शक तत्वे

२) कोविड-१९ टाळेबंदीनंतर आर्थिक पुनरुत्थन मार्गदर्शक तत्वे

३) शेतकरी संघटना – मार्गदर्शक तत्वे

४) हरित हवामान निधीविषयक पुस्तिका

५) पूर्व कौशल्यज्ञान मान्यता – मार्गदर्शक सूचना

६) नविन गृहनिर्माण धोरण -२०२१

७) टाळेबंदीमधील चित्रपटगृहे, मंदिरे यांबाबतच्या निर्बंधाविषयीच्या मार्गदर्शक सूचना

**(७) विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे मराठीकरण :-**

**अ)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०२ व २०५ अन्वये वित्त विभागामार्फत राज्य विधानमंडळाच्या तीनही अधिवेशनामध्ये सादर केल्या जाणाऱ्या पुढील अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद, अनुवाद तपासणी, सुधारणा, मुद्रित वाचन, इत्यादी कामे तसेच मा.वित्त मंत्र्यांच्या भाषणाच्या अनुवादाची कामे भाषा संचालनालयाद्वारे केली जातात :

१) खर्चाचे पूरक विवरणपत्रे.

२) अर्थसंकल्पविषयक निवेदन.

३) अर्थसंकल्पीय अंदाज.

४) अधिक खर्चाचे विवरणपत्र.

५) नवीन बाबींचे विवरणपत्र

सन २०२०-२१ या वर्षात पुढील अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करण्याचे आणि त्याच्या अंतिम मुद्रणापर्यंतची कामे पार पाडलेली आहे.

१) खर्चाचे पूरक विवरणपत्र, २०२०-२१, (सप्टेंबर, २०२० व डिसेंबर, २०२०), २०२०-२१ (मार्च, २०२१)

२) नवीन बाबींचे विवरणपत्र, (मार्च, २०२१) अर्थसंकल्पविषयक निवेदन २०२०-२०२१ .

**(८) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षा अहवालांचे मराठीकरण :-**

**अ)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यामार्फत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५१ अन्वये मा. राज्यपालांना सादर केल्या जाणाऱ्या व दरवर्षी विधानमंडळात सादर केल्या जाणाऱ्या पुढील अहवालांचा मराठी अनुवाद, अनुवाद तपासणी व मुद्रित वाचन, इत्यादी कामे भाषा संचालनालयाद्वारे केली जातात :

१) वित्तीय लेखा.

२) विनियोजन लेखा.

३) लेख्यांवरील ओझरता दृष्टीक्षेप.

गेल्या वर्षी उपरोक्त अहवालांपैकी, पुढील अहवालांचे मराठीकरण करण्यात आले.

१) वित्तीय लेखा, २०१९-२०

२) विनियोजन लेखा, २०१९-२०

३) लेख्यावरील ओझरता दृष्टीक्षेप, २०१९-२०

**(९) परिभाषा व शब्दकोश निर्मिती कार्य :-**

**अ)** शासन व्यवहारात व न्याय व्यवहारात आणि शालेय व विद्यापीठ स्तरावरील अभ्यासक्रमात मराठीचा वापर करण्यासाठी प्रशासकीय, तांत्रिक व शास्त्रीय विषयांचे परिभाषा कोश व शब्दकोश तयार करण्याचे व अद्ययावत करण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जात आहे.

**ब)** परिभाषा निर्मिती व कोश निर्मिती हे कार्य संशोधन व अकादमिक स्वरूपाचे आहे.

**क)** विविध विषयतज्ज्ञांचा समावेश असलेल्या भाषा सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य पूर्वी करण्यात आले. आता भाषा सल्लागार समितीच्या मार्गदर्शनाखाली व संबंधित विषयांच्या तज्ज्ञांची उपसमिती घटित करुन नवीन परिभाषा कोश निर्मितीचे व पूर्वीच्या कोशांमध्ये सुधारणा करुन त्यांचे अद्ययावतीकरण करण्याचे काम सुरू आहे.

**ड)** तसेच जनतेच्या मागणीनुसार, परिभाषा कोशांचे स्कॅन करुन/ मुद्रित स्वरूपात पुनर्मुद्रण करण्याचे कामदेखील नियमितपणे चालू आहे.

**(अ) भाषा संचालनालयाने तयार केलेले परिभाषा कोश, शब्दकोश व शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका**

**१) शब्दकोश:-** भाषा संचालनालयाने शासन व्यवहारास व न्याय व्यवहारास उपयुक्त असलेले पुढील कोश प्रसिध्द केलेले आहेत

| | | | |
|---|---|---|---|
| १) शासन व्यवहार कोश | २) प्रशासन वाक्प्रयोग | ३) पदनाम कोश | ४) वित्तीय शब्दावली |
| ५) शासन व्यवहार शब्दावली | ६) न्यायव्यवहार कोश | | |

**२) शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका:-** भाषा संचालनालयाने शासन व्यवहारास उपयोगी असलेल्या पुढील मार्गदर्शक पुस्तिका व ग्रंथ प्रसिध्द केलेले आहेत:

| | | | |
|---|---|---|---|
| १) प्रशासनिक लेखन | २) राजभाषा परिचय | ३) कार्यदर्शिका | ४) मराठी लघुलेखन मार्गदर्शिका |
| ५) शासन व्यवहारात मराठी | ६) मराठी टंकलेखन प्रवेशिका | ७) प्रमाणलेखन नियमावली | ८) मंथन |
| ९) मराठी लघुलेखन | १०) राजभाषा परिचय व कार्यरुप व्याकरण | ११) संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका | १२) शासन व्यवहार नित्योपयोगी लघुपुस्तिका |

**३) परिभाषा कोश:-** भाषा संचालनालयाने विविध विषयांचे पुढील शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा कोश प्रसिध्द केलेले आहेत:

| | | | |
|---|---|---|---|
| १) लोकप्रशासन परिभाषा कोश | २) कृषिशास्त्र परिभाषा कोश | ३) तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश | ४) गणितशास्त्र परिभाषा कोश |
| ५) शिक्षणशास्त्र परिभाषा कोश | ६) मानसशास्त्र परिभाषा कोश | ७) रसायनशास्त्र परिभाषा कोश | ८) यंत्र अभियांत्रिकी परिभाषा कोश |
| ९) भूगोलशास्त्र परिभाषा कोश | १०) न्यायवैद्यक व विषशास्त्र परिभाषा कोश | ११) औषधशास्त्र परिभाषा कोश | १२) व्यवसाय व्यवस्थापन परिभाषा कोश |
| १३) साहित्य समीक्षा परिभाषा कोश | १४) वृत्तपत्रविद्या परिभाषा कोश | १५) वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश | १६) धातुशास्त्र परिभाषा कोश |
| १७) शारीरशास्त्र परिभाषा कोश | १८) ग्रंथालयशास्त्र परिभाषा कोश | १९) विद्युत अभियांत्रिकी परिभाषा कोश | २०) संख्याशास्त्र परिभाषा कोश |
| २१) शरीरक्रियाशास्त्र परिभाषा कोश | २२) भूशास्त्र परिभाषा कोश | २३) स्थापत्य अभियांत्रिकी परिभाषा कोश | २४) अर्थशास्त्र परिभाषा कोश |
| २५) जीवशास्त्र परिभाषा कोश | २६) भौतिकशास्त्र परिभाषा कोश | २७) राज्यशास्त्र परिभाषा कोश | २८) भाषाविज्ञान व वाङ्.मयविद्या परिभाषा कोश |
| २९) समाजशास्त्र परिभाषा कोश | | | |

**४) पारिभाषिक शब्दावल्या:-** भाषा संचालनालयाने, शास्त्रीय व तांत्रिक विषयाच्या पुढील शब्दावल्या मराठी X इंग्रजी या स्वरुपात प्रसिध्द केलेल्या आहेत:

| | | |
|---|---|---|
| १) विकृतीशास्त्र पारिभाषिक शब्दावली | २) भौतिकशास्त्र पारिभाषिक शब्दावली | ३) कृषिशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| ४) वाणिज्यशास्त्र पारिभाषिक शब्दावली | | |

**(आ) परिभाषा कोशांमध्ये व शब्द कोशांमध्ये सुधारणा करुन त्यांचे पुनर्मुद्रण करण्याचा प्रकल्प :-**

१. शासन व्यवहार कोश – शासन व्यवहार कोश (सुधारित) परिभाषा कोशाच्या बैठका पूर्ण झाल्या असून मा.मंत्री मराठी भाषा यांच्या आदेशानुसार सुलभीकरणाच्या दृष्टीने काम सुरु आहे. मूळ परिभाषा कोशात, बैठकीत चर्चेअंती निश्चित झालेल्या संज्ञा समाविष्ट करुन मुद्रणप्रत तयार करुन पूर्ण झाली असून , शासन व्यवहार कोशाची सदर मुद्रणप्रतीचे हस्तलिखित मुद्रणालयात पाठविले असून **A** ते **S** वर्णाची मुद्रित पृष्ठे कार्यालयास प्राप्त झाली असून **T** ते **Z** प्रलंबित आहे.

२. कृषिशास्त्र परिभाषा कोशांच्या (सुधारित) बैठका सुरु आहेत. अजून दोन बैठका अपेक्षित आहेत.

३. अर्थशास्त्र परिभाषा कोश (सुधारित) चे पहिले मुद्रित तपासणीच्या अंतिम टप्प्यावर असून दुसऱ्या मुद्रितासाठी शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयात लवकरात लवकर पाठविण्यात येईल.

४. तत्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोशांचे हस्तलिखित तपासणीच्या अंतिम टप्प्यावर असून लवकरच ते पहिल्या मुद्रिताकरिता पाठविण्यात येईल.

५. स्थापत्यशास्त्र परिभाषा कोशाचे दुसरे मुद्रित तपासणीच्या अंतिम टप्प्यावर असून लवकरच ते तिसऱ्या मुद्रितासाठी मुद्रणालयात पाठविण्यात येईल.

६. भूशास्त्र, धातुशास्त्र, यंत्रअभियांत्रिकी, भाषाविज्ञान व वाङमयविद्या परिभाषा कोश हे परिभाषा कोश पुनर्मुद्रणासाठी मुद्रणालयात पाठविण्यात आलेले आहेत.

**(इ) विविध उपसमित्यांमार्फत सुरू असलेल्या परिभाषा कोशांच्या कामकाजाची सद्यस्थिती:-**

१) शासन व्यवहार कोश, २) कृषिशास्त्र परिभाषा कोश, ३) अर्थशास्त्र परिभाषा कोश, ४) तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश व ५) शिक्षणशास्त्र परिभाषा कोश या कोशांमध्ये सुधारणा करुन तेअद्ययावत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यापैकी तत्वज्ञान व तर्कशास्त्र आणि अर्थशास्त्र या परिभाषा कोशांच्या अद्ययावतीकरणाचे काम त्यांच्या उपसमित्यांमार्फत पूर्ण झाले असून ते मुद्रणाच्या टप्प्यावर आहे.

**(ई) भाषा संचालनालयाची प्रकाशने संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबतची सद्य:स्थिती: -**

भाषा संचालनालयाचे परिभाषा कोश व अन्य प्रकाशने ई-पुस्तकाच्या स्वरूपात भाषा संचालनालयाच्या http://directorate.marathi.gov.in/ या संकेतस्थळाअंतर्गत असलेल्या https://shabdakosh.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच कोश/परिभाषा कोश याचे भ्रमणध्वनी उपयोजक देखिल उपलब्ध आहे.

** **शासन शब्दकोश**-भाग-१ हे भ्रमणध्वनी उपयोजक गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्याचा दुवा (लिंक) http://play.google.com/store/apps/details?id=gov.maharashtra.shabdkoshapp असा आहे.

**(१०) शासन व्यवहारात मराठीचा वापर (शासकीय कार्यालयांची तपासणी):-**

अ) राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे अनिवार्य केलेले असल्याने, शासन व्यवहारात मराठीचा वापर केला जातो किंवा कसे यादृष्टीने महाराष्ट्रातील मंत्रालयीन विभाग आणि शासकीय व निम-शासकीय कार्यालये यांची तपासणी करणे, त्यासंबंधातील अडचणी सोडविणे व मार्गदर्शन करणे आणि करावयाच्या उपाययोजनासंबंधी शासनाकडे अहवाल पाठविणे, इत्यादी कामे भाषा संचालनालयामार्फत केली जातात.

ब) मुख्यालय स्तरावर भाषा संचालक व विभागीय स्तरावर विभागीय सहायक भाषा संचालक यांच्या नेतृत्वाखालील तपासणी पथकाद्वारे शासकीय कार्यालयांची तपासणी केली जाते.

क) आतापर्यंत राज्यातील सुमारे १०२५ शासकीय व निमशासकीय कार्यालयांची आणि ११ मंत्रालयीन विभागांची तपासणी केली आहे.

सन २०२२-२३ मध्ये कोवीड-१९ च्या संसर्गाची परिस्थिती निवळल्यास २५० कार्यालयांची तपासणी करण्याचे प्रस्तावित आहे.

**(११) भाषाविषयक परीक्षा:** एतदर्थ मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या पुढील परीक्षा घेण्याची संपूर्ण जबाबदारी भाषा संचालनालय पार पाडत आहे. या परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतल्या जातात. सदर परीक्षा पुढीलप्रमाणे आहेत:

१. मराठी भाषा (राजपत्रित) परीक्षा.

२. मराठी भाषा (अराजपत्रित) परीक्षा.

३. हिंदी भाषा (उच्च श्रेणी) परीक्षा.

४. हिंदी भाषा (निम्न श्रेणी) परीक्षा.

५. मराठी टंकलेखन परीक्षा.

६. मराठी लघुलेखन परीक्षा.

सन २०२१-२०२२ मध्ये माहे ऑक्टोबर, २०२१ पर्यन्त एतदर्थ मंडळाच्या मराठी भाषा, हिंदी भाषा, टंकलेखन व लघुलेखन परीक्षांसाठी एकूण २५९० उमेदवार बसले होते. सन २०२२-२०२३ मध्ये ३५०० उमेदवार बसण्याची शक्यता आहे.

भाषा संचालनालयाची माहिती directorate.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच संचालनालयाकडून प्रसिध्द करण्यात आलेले विविध परिभाषा कोश/शब्दकोश यातील माहिती एकत्रितपणे http://shabdkosh.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# भाषा संचालनालय

## कर्मचारी विषयक गोषवारा

## Personnel Summary

| अ क्र. | पदनाम | वेतनश्रेणी SCALE OF PAY | पदांची संख्या | DESIGNATION |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | | |
| १. | भाषा संचालक | एस-२५ : ७८८००-२०९२०० | १ | Director of Languages |
| २. | भाषा उपसंचालक (अनुवाद व शब्दावली) | एस-२० : ५६१००-१७७५०० | १ | Dy.Director of Languages (Translation & Terminology) |
| ३. | भाषा उपसंचालक (विधि) | एस-२० : ५६१००-१७७५०० | १ | Dy.Director of Languages (Law) |
| ४. | विभागीय सहायक भाषा संचालक | एस-१६ : ४४९००-१४२४०० | ४ | Divisional Assistant Director of Languages |
| ५. | सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ४ | Assistant Director of Languages (Translation & Terminology) |
| ६. | सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Director of Languages (Training & Establishment) |
| ७. | भाषा अधिकारी (हिंदी) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Language Officer (Hindi) |
| | | **एकूण (अ)** | **१३** | **Total (A)** |
| **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | | |
| ८. | मराठी लघुलेखक (उच्चश्रेणी) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Marathi Stenographer (H.G.) |
| ९. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Stenographer (L.G.) |
| १०. | पर्यवेक्षक (मराठी/हिंदी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १० (९+१) | Superviser |
| ११. | अधीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ७ | Superintendent |
| १२. | अनुवादक (मराठी/हिंदी) | एस-१३ : ३५४००-११२४०० | ४६ (४२+४) | Translator |
| १३. | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५५००-८११०० | १० | Senior Clerk |
| १४. | मराठी लघुटंकलेखक | एस-८ : २५५००-८११०० | १ | Steno-Typist (Marathi) |
| १५. | लिपिक-टंकलेखक (मराठी) | एस-६ : १९९००-६३२०० | १७ | Clerk-Typist (Marathi) |
| १६. | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) | एस-६ : १९९००-६३२०० | १ | Clerk-Typist (English) |
| १७. | कनिष्ठ ग्रंथपाल | एस-७ : २१७००-६९१०० | १ | Junior Librarian |
| १८. | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Driver |
| | | **एकूण (ब)** | **९७** | **TOTAL (B)** |
| **(क) वर्ग ड (C) Class D** | | | | |
| १९. | नाईक | एस-३ : १६६००-५२४०० | २ | Naik |
| २०. | चपराशी | एस-१ : १५०००-४७६०० | १५ | Peon |
| | | **एकूण (क)** | **१७** | **TOTAL (C)** |
| **एकूण (अ + ब + क)** | | | **१२७** | **GRANT TOTAL(A+B+C)** |

## कार्यक्रम क्रमांक ४

## राज्य मराठी विकास संस्था

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक १ मे १९९२ रोजी 'राज्य मराठी विकास संस्थेची' स्थापना केली. 'संस्था नोंदणी अधिनियम, १८६०' आणि 'सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०' अन्वये दिनांक ०२ जानेवारी १९९३ रोजी संस्थेची धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे स्वायत्त संस्था म्हणून नोंदणी झाली. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यानंतर दिनांक ०१ मार्च १९९३ पासून संस्थेच्या कामकाजास सुरुवात झाली. तेव्हापासून संस्था मराठी भाषेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे.

**संस्थेची उद्दिष्टे :**

विविध क्षेत्रांत होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा, यासाठी प्रयत्नशील राहणे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करणे ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत. त्यानुसार सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी संस्था स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेते. भाषा व संस्कृतीच्या क्षेत्रात मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या सहाय्यानेही काही उपक्रम संस्था पार पाडते.

**प्रशासकीय व्यवस्था :**

संस्थेचे कामकाज तिच्या नियामक मंडळाच्या मान्यतेने चालते. संस्थेचे कार्यक्रम/उपक्रम/प्रकल्प यांचे अग्रक्रम ठरविण्यासाठी नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार एक उपक्रम समिती, आर्थिक बाबी विचारात घेण्यासाठी नियामक मंडळाच्या सदस्यांमधून निर्माण केलेली एक वित्त समिती आणि संस्थेचे आर्थिक, प्रशासकीय व कायदेशीर नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी तसेच संस्थेच्या विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक कार्यकारी समिती नेमण्यात आली आहे. संस्थेच्या विविध कार्यासाठी या कार्यकारी समितीची मंजुरी आवश्यक असते.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री हे संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री हे संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष आहेत.

**संस्थेचे आजवरचे कार्य :**

संस्थेने आपल्या उद्दिष्टांना अनुसरून विविध प्रकारचे उपक्रम आयोजित केले आहेत.

**अ) चर्चासत्रे :** आजपर्यंत विविध विषयांवर २५ हून अधिक राज्यस्तरीय चर्चासत्रांचे आयोजन राज्य मराठी विकास संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

**(ब) काही महत्त्वपूर्ण प्रकाशने:** मराठी भाषेच्या विकासाला पूरक असे माहितीकोश, संकल्पनाकोश, सूची, माहितीपुस्तिका, कार्यपुस्तिका, वैचारिक, संशोधनात्मक लेखन, मराठी साहित्यकृतींची हिंदी भाषांतरे अशी विविधांगी पुस्तके संस्थेने प्रकाशित केली आहेत. त्यापैकी काही उल्लेखनीय प्रकाशने पुढीलप्रमाणे आहेत:-

**(१) भाषाविषयक:**

(अ) शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम - (संपादन - रमेश पानसे) जन्मभाषेचा पाश तोडून आम्ही काय करणार? ना देश, ना गोत, ना राष्ट्र असे आम्हांस व्हावयाचे आहे काय?, या मौलिक आणि मूलभूत प्रश्नाला भिडणारे, मराठीच्या शिक्षणक्रमाशी संबंधित असलेले एक जुने (१९०६) चिरतरुण पुस्तक.

(ब) मराठी भाषा: वाढ आणि बिघाड - (श्री. के. क्षीरसागर) मराठी बोलताना आणि तिच्यातून लेखनव्यवहार पार पाडताना सर्वसामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे-जे प्रश्न घुटमळत आहेत, त्यांचा मुक्त मनाने घेतलेला परामर्श.

(क) महाराष्ट्राचा भाषिक नकाशा पूर्वतयारी - (प्रमुख संशोधक - डॉ. रमेश धोंगडे, संशोधन समन्वयक आणि संशोधक साहाय्यक - डॉ. अशोक सोलनकर) प्रमाण मराठी, बोली, उपभाषा, आदिवासींच्या भाषा, मिश्रभाषा इत्यादिंचे विविध भाषिक आविष्कार, त्यांची प्रदेशानुसार नकाशाद्वारे मांडणी करून महाराष्ट्रातील भाषांची वैविध्यपूर्ण माहिती देणारा ग्रंथ.

**(२) कोश व सूची वाङ्मय:**

**(अ)** कोश व सूची वाङ्मय: स्वरुप आणि साध्य - (संपादन - सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन) बी. ए., एम. ए. चे मराठी विषयाचे विद्यार्थी, ग्रंथालयशास्त्र विद्यार्थी तसेच संशोधनपर लेखन करू इच्छिणाऱ्यांसाठी उपयुक्त. संस्कृत-इंग्रजी-मराठी भाषांतील वैविध्यपूर्ण कोश व सूचीवाङ्मयाचा सांगोपांग परिचय करून देणारा ग्रंथ.

**(ब)** शालेय मराठी शब्दकोश - (वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके) इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विषयांच्या मराठी पाठ्यपुस्तकांशी संबंधित शब्द, संज्ञा, वाक्यप्रचार आदिंची सचित्र व सोदाहरण ओळख. मराठी अभ्यास परिषदेतर्फे दिले जाणारे मराठी भाषाविषयक लेखनाचे महाबँक पारितोषिक १९९९. आजपर्यन्त या कोशाच्या तीन सुधारित आवृत्त्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

**(क)** विज्ञान संकल्पना कोश - (प्रा. रा. वि. सोवनी) इयत्ता ५ वी ते १० पर्यंतच्या रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्रातील संकल्पना सुबोध मराठीतून उलगडून सांगणारा कोश. (मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने)

**(ड)** मराठी लघुलेखन शब्दकोश (व. वा. इनामदार) मराठी लघुलेखनाचे शिक्षक आणि विद्यार्थी यांना सरावासाठी उपयुक्त ठरलेला लघुलेखनविषयक एकमेव ग्रंथ. ना. गो. कालेलकर पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार १९९५-९६.

**(इ)** दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश व विधीकोश - (संपादक - डॉ. गंगाधर पानतावणे) याकरिता इ.स. १८१८ ते २००५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या साहित्यातून दलित-ग्रामीण जीवनानुभव व्यक्त झाले आहेत असे साहित्य या शब्दकोशासाठी आधारभूत मानले आहे. आजवर शब्दकोशाचे तीन खंड व विधीकोशाचा १ खंड असे एकूण ४ खंड प्रकाशित.

**(३) शैक्षणिक:**

**(अ)** मराठी लेखन मार्गदर्शिका - (यास्मिन शेख) सर्वसामान्य नागरिक, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, भाषा शिकणाऱ्या अन्य भाषक व्यक्ती, दूरचित्रवाणीपटावर लेखन करणारे कलावंत, पाट्या रंगविणारे रंगारी, टंकलेखक, संगणकावर अक्षरजुळणी करणारे जुळारी अशा सर्वांना मराठीत लेखन करण्यासाठी बिनचूक मार्गदर्शन करणारे उपयुक्त पुस्तक. आजपर्यन्त या कोशाच्या तीन सुधारित आवृत्त्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

**(ब)** प्रशासनिक मराठी भाषेचा विकास - (गीता भागवत) प्रशासनिक लेखन करणा-यांसाठी मार्गदर्शनपर सूचनांसह, प्रशासनिक मराठीच्या वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेला अभ्यास.

**(क) इतर उपक्रम:**

**(१) इतर राज्यांतील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मदत व भारतातील विविध राज्यांतील व जगातील अनेक देशांतील मराठी भाषकांसाठी उपक्रम**: मध्यप्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात इत्यादि राज्यांतील शाळांना महत्त्वाची पुस्तके पाठवण्याचे काम संस्था करीत आहे. सन १९९४ पासून संस्थेने आंध्रप्रदेशातील महाराष्ट्र मंडळ, हैद्राबाद यांना व त्यांनी सुचविलेल्या शाळांतील इयत्ता १ली ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना बालभारती, कुमारभारती, युवकभारती अशी मराठीची पाठ्यपुस्तके पाठविण्यात येतात. महाराष्ट्र मंडळ ही पुस्तके विद्यार्थी प्रतिष्ठान महाराष्ट्र मंडळ (आंध्र प्रदेश)

यांच्यामार्फत संबंधित शाळांना वितरित करीत असते. तसेच गुजरात राज्यातील अहमदाबाद येथील मराठी मंडळांच्या शाळांना दैनिक लोकसत्ता, पुणे सकाळ ही वर्तमानपत्रे व नियतकालिके पाठविण्यात येतात.

**(२) बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसहाय्य योजना:** महाराष्ट्र शासनाने सन २०१० मध्ये स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण ४ "भाषा आणि साहित्य" याअंतर्गत बृहन्महाराष्ट्र या विभागात उल्लेखिल्यानुसार महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात आणि महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना अर्थसाहाय्य देण्याची योजना कार्यान्वित आहे. राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील "अन्य राज्यात व परदेशात असलेल्या मराठी भाषकांसाठी विविध भाषिक उपक्रम करणे" ह्या उद्दिष्टाचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत राबविण्यात येणारी ही योजना शासन निर्णय, मराठी भाषा विभाग दिनांक १३ जून, २०१६ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेकडे हस्तांतरित केली आहे. या योजनेअंतर्गत, महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत बृहन्महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्था/मंडळे यांना विहित कार्यपद्धतीनुसार एका संस्थेला जास्तीतजास्त २ लाख तर एकूण २० लाख रुपयांच्या मर्यादेत अर्थसहाय्य करण्यात येते.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून आजवर संस्थेच्या विहित कार्यपध्दतीने एकूण ८७ मान्यताप्राप्त संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

**(३) मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा** – या अंतर्गत बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली ही संस्था गेली ३० वर्षे मराठी भाषा, संस्कृती व सामान्य ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा आयोजित करते. बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली आणि राज्य मराठी विकास संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सन २०१८ पासून सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.

१. सन २०१८ मध्ये एकूण ५१ केंद्र व १९४३ स्पर्धक सहभागी

२. सन २०१९ मध्ये एकूण ३२ केंद्र व १७४७ स्पर्धक सहभागी

३. सन २०२० मध्ये एकूण २३ केंद्र व ९७५ स्पर्धक सहभागी

कोविड-१९ च्या उद्भवलेल्या प्रादुर्भावामुळे सन २०१९ आणि २०२० या दोन्ही वर्षातील बक्षीस समारंभ कार्यक्रम संपन्न होऊ शकला नाही. तथापि सदर दोन्ही वर्षातले बक्षीस समारंभ कार्यक्रम दिनांक ५ डिसेंबर, २०२१ या तारखेला मध्यप्रदेशातील देवास येथे संपन्न झाला.

**(४) वाचन प्रेरणा दिन:** भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सन २०१५ पासून दरवर्षी दिनांक १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त विविधांगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. सन २०१९ मध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त महाराष्ट्रातील अ,ब,क व ड या वर्गातील सर्व ग्रंथालये आणि वाचनकट्टा यांना पाच हजार रुपये इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले.

सन २०२० मध्ये कोविड-१९ प्रादुर्भावामुळे, महाराष्ट्रातील जनतेपर्यन्त मराठी भाषा व मराठी साहित्य वाचनाचे महत्व व पुस्तक वाचनाला प्रोत्साहन मिळावे याउद्देशाने साहित्ययान या उपक्रमाचे आभासी पध्दतीने आयोजन केले होत. या कार्यक्रमात प्रा.डॉ. भालचंद्र नेमाडे, प्रा. रंगनाथ पठारे, श्री.किशोर कदम (सौमित्र) इत्यादि श्रेष्ठ साहित्यिक तसेच प्रमोद पवार, श्रीमती मुक्ता बर्वे इत्यादि कलावतांचा सहभाग शक्य झाला. तसेच हा कार्यक्रम आभासीमाध्यमातून असल्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला.

वाचनप्रेरणा दिन २०२१ निमित्त दिनांक १५ ऑक्टोबर, २०२१ रोजी राज्य मराठी विकास संस्थेद्वारे महाजालीय अभिवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली. तसेच, महाजालीय अभिवाचन उपक्रमही राबविण्यात आला.

(५) **मराठी भाषा गौरव दिन:** शासनाच्या धोरणानुसार कवी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा केला जातो. शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ अन्वये सन २०१६ पासून "डॉ. अशोक रा. केळकर मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार" आणि "कविवर्य मंगेश पाडगावकर मराठी भाषा संवर्धक पुरस्कार" हे दोन नवीन पुरस्कार मराठी भाषा संवर्धनासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तीस अथवा संस्थेकरिता सुरु करण्यात आले आहेत. मराठी भाषा गौरवदिन समारंभाच्या वेळी सदर पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

या पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी रु. २,००,०००/- (रु. दोन लाख फक्त) रोख मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

मराठी भाषेचा अधिक प्रसार व प्रचार व्हावा यादृष्टीने सदर दोन्ही पुरस्कार सन २०२१ पासून व्यक्ती आणि संस्था यांना स्वतंत्रपणे देण्याचा निर्णय घेण्यात आला असून दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या बैठकीत मंत्रीमंडळाने वरील दोन ऐवजी चार पुरस्कार ( २ व्यक्ती व २ संस्था यांना) सन २०२१ या वर्षापासून प्रदान करण्यास मान्यता दिली आहे.

सन २०२० या वर्षीचा "अशोक केळकर, मराठी भाषा-अभ्यासक पुरस्कार" डॉ.सुधीर रसाळ यांना व "मंगेश पाडगावकर, मराठी भाषा-संवर्धक पुरस्कार" श्री. संजय भगत (व्यक्तीसाठी) व महाराष्ट्र साहित्य परिषद, तेलंगण राज्य (संस्थेसाठी) यांना दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी मराठी भाषा गौरव दिनी प्रदान करण्यात आला.

तसेच सन २०२१ या वर्षीचा "अशोक केळकर, मराठी भाषा-अभ्यासक पुरस्कार" डॉ.रमेश वरखेडे (व्यक्तीसाठी) व मराठी अभ्यास परषिद, पुणे (संस्थेसाठी) यांना व "मंगेश पाडगावकर, मराठी भाषा-संवर्धक पुरस्कार" डॉ.चंद्रकांत पाटील (व्यक्तीसाठी) व महाराष्ट्र अभ्यास केंद्र, मुंबई (संस्थेसाठी) यांना जाहीर करण्यात आला असून हे पुरस्कार दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी मराठी भाषा गौरव दिनी प्रदान करण्यात आले.

(५) **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा:** सन २०२२ मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२२ या कालावधीत "साहित्य सेतू- डिजिटल वाचन कट्टा" या कार्यक्रमाचे आभासी पध्दतीने आयोजन करण्यात आले. तसेच मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात अभिजात मराठी भाषेचे दालन तसेच राज्य मराठी विकास संस्थेची निर्मिती असलेल्या " शांतता ....मराठीचे कोर्ट चालू आहे." या लघुपटाचे खेळ ३ दिवस सादर करण्यात आले.

अभिजात मराठी भाषेच्या दालनामध्ये प्रामुख्याने मराठीच्या प्राचीनत्वाची मांडणी करणारी उदाहरणे, मराठीचे भाषिक आणि कालिक भेद दर्शविणारा आढावा, मराठीतील उपलब्ध आणि अधिकृत शिलालेखांच्या प्रतिकृती, मराठीच्या मध्ययुगीन वैभवाची मांडणी, बहमनीकाळ ते शिवकालीन आणि पेशवेकालीन मराठी, एकोणिसाव्या शतकातील मराठी, आधुनिकता आणि मराठी, मराठी साहित्यपरंपरेचे दालन अशा दोन हजार वर्षापूर्वीच्या मराठी भाषेच्या प्रवासासंबंधी माहिती देणाऱ्या विविध सबळ पुराव्यांचे आणि त्याच्याशी संबंधित शिलालेखांच्या प्रतिकृती, ताम्रपट, नाणी, भाषेचे टप्पे, विविध वाङ्मयप्रकार, काही निवडक गाथा, दुर्मिळ ग्रंथ, शिलालेख, साहित्य यांच्या प्रतिकृतींचे या प्रदर्शनात १३ विविध दालने उभारण्यात आली होती.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा यासाठी विनंती करणारी पत्रे दालनास भेट देणाऱ्या मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या सहीने मा.राष्ट्रपती महोदयांना पाठविण्यात आली आहेत.

**(ड) संस्थेत सुरु असलेले उल्लेखनीय प्रकल्प:**

**(१) दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश व साहित्यसूची:** दलित आणि ग्रामीण साहित्य हे मराठी साहित्यातील महत्त्वाचे असे दोन प्रवाह आहेत. अपरिचित शब्द, संज्ञा, संकल्पना, म्हणी, वाक्यप्रयोग यांमुळे हे साहित्य काही प्रमाणात वाचकांच्या दृष्टीने दुर्बोध राहिले आहे. लोकजीवनाच्या वेगवेगळ्या अंगांशी निगडित अशा दलित-ग्रामीण साहित्यातील, शब्दांचा नेमका अर्थ सापडेल असा शब्दकोश आज मराठीत नसल्याने तसेच ह्या साहित्यामधून जे नवनवीन आणि अपरिचित शब्द मिळतात ते प्रमाण मराठी भाषेत येणे आवश्यक असल्याने असे शब्द विविध साहित्यकृतींमधून निवडून त्यांचे अर्थ तपशीलांसह या कोशात दिलेले आहेत. तो विशिष्ट शब्द असलेले साहित्यकृतीतील मूळ वाक्यही वाचकांच्या संदर्भासाठी त्या त्या नोंदीमध्ये दिलेले आहे. या कोशाचे तीनही खंड प्रकाशित झाले आहेत. दलित-ग्रामीण वर्णनात्मक सूचीचे काम चालू असून या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी नवीन संपादक मंडळ गठित करण्यात आले आहे.

**दलित-ग्रामीण-साहित्य रूढी, प्रथा, परंपरा विधिकोश :** दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश या प्रकल्पाचाच हा एक भाग असून त्यामध्ये दलित व ग्रामीण साहित्यकृतींमधून आलेल्या विविध जाती-जमातींच्या विधि, रूढी, प्रथा, परंपरा, श्रद्धा, समजुती, सण-उत्सव, नवस-सायास, दैवत, लोकाचार इत्यादि विषयांच्या अनुषंगाने सांस्कृतिक संदर्भ असलेल्या अनेक संकल्पनांचे संकलन करून त्यांची सचित्र स्पष्टीकरणात्मक माहिती या कोशातून दिलेली असून हा कोश प्रकाशित करण्यात आला आहे.

**(२) वस्त्रनिर्मिती-माहितीकोश:** वस्त्रोद्योगाची सर्वांगीण व अद्ययावत माहिती मराठी भाषेतून उपलब्ध करून देणारा 'वस्त्रनिर्मिती माहितीकोश' हा प्रकल्प राज्य मराठी विकास संस्था आणि दत्ताजीराव कदम तांत्रिक शिक्षण संस्था, इचलकरंजी यांनी संयुक्तपणे कार्यान्वित केला आहे. झपाट्याने विकसित होणाऱ्या विज्ञान-तंत्रज्ञानामुळे भारतातील वस्त्रोद्योगाचा, वस्त्रनिर्मितीकलेचा विकास कसा होत गेला ते विकासाचे टप्पे, भारतीय वस्त्रोद्योगाचे आजवरचे स्वरूप त्याची वैज्ञानिक-तांत्रिक प्रगती, महाराष्ट्राचे या उद्योगामधील स्थान, होऊ घातलेले जागतिकीकरण या सर्वांचा साकल्याने विचार या कोशात करण्यात आला आहे. मराठीच्या आणि महाराष्ट्राच्या संदर्भात वस्त्रोद्योगाला प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान आहे, परंतु या विषयासंबंधी फारच थोडे दर्जेदार लिखाण मराठी भाषेत उपलब्ध आहे. ही त्रुटी दूर करण्यासाठी सर्वसामान्य जिज्ञासूला समजेल अशी माहिती या कोशात देण्यात आली आहे. या माहितीकोशाचे एकूण नऊ खंड संकल्पित असून संस्थेने आतापर्यंत (१) खंड १ - तंतुनिर्माण व तंतुविज्ञान, (२) खंड २ - सूतनिर्माण, (३) खंड ३ - कापडनिर्माण, (४) खंड ४ - रासायनिक प्रक्रिया. (५) खंड ५ - फॅशन व वस्त्रप्रावरणे या पाच खंड प्रकाशित झालेले आहेत. उर्वरित (१) खंड ६ - तंत्रोपयोगी वस्त्रे, (२) खंड ७ - वस्त्रोद्योग व्यवस्थापन, (३) खंड ८ - वस्त्र संकल्पनेचा सांस्कृतिक अविष्कार या तीन खंडांचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे.

खंड ५ - फॅशन व वस्त्रप्रावरणे हा संस्थेच्या संकेतस्थळावर वाचकांसाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. अन्य ४ खंड संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

**(३) मराठी ग्रंथसूचिमाला (१९५१-२०००):** कै.शं. ग. दाते यांनी सन १८०० ते १९५० पर्यंतच्या मराठी ग्रंथांची विषयवार सूची दोन भागांत तयार केली होती. ही सूची बरीच वर्षे अनुपलब्ध असल्याने तिचे नवीन परिशिष्टांसह पुनर्मुद्रण संस्थेमार्फत करण्यात आले होते. इ. स. १९५० नंतर मराठीमध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांची एकत्रित अशी विषयवार ग्रंथसूची उपलब्ध नसल्याने राज्य मराठी विकास संस्थेने 'मराठी ग्रंथसूचीमाला' हा प्रकल्प हाती घेतला असून त्याअंतर्गत इ. स. १९५१

ते २००० या कालखंडातील मराठी ग्रंथांची विषयवार सूची करण्यात येत आहे. आतापर्यंत या मालेतील चार भाग - भाग ३ (१९५१-१९६२), भाग ४(१९६३-१९७०), भाग ५ (१९७१-१९७८) आणि भाग ६ (१९७९-१९८५) - प्रकाशित करण्यात आले आहेत. भाग-७ (१९८६-१९९०) या कालखंडातील हस्तलिखित नोंदी संगणकीकृत करुन पूर्ण झालेल्या असून त्या विदागाराच्या स्वरुपात महाजालावर शोधसुकर स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच भाग-८ (१९९१-२०००) यामधील ग्रंथांच्या सूचीचे संपादकीय काम पूर्ण झाले असून या नोंदीही लवकरच शोधसुकर पध्दतीने महाजालावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

**(४) मराठी उत्तमोत्तम साहित्यकृतींची श्राव्य पुस्तके (ऑडिओ सीडीज) :** या प्रकल्पांतर्गत मराठीतील प्रसिद्ध निवडक संतसाहित्य तसेच ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या साहित्यिकांचे साहित्य, साहित्य अकादमी पारितोषिक विजेते साहित्य व महाराष्ट्र शासन पारितोषिक विजेते निवडक साहित्यकृतींची श्राव्य पुस्तके तयार करण्यात येणार असून, आतापर्यंत कृष्णाकाठ (स्व.यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र) व श्री दासबोध (श्री समर्थ रामदास कृत) या ग्रंथांची श्राव्य पुस्तके तयार करण्यात आली असून ती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच त्यांच्या ऑडिओ सीडीही संस्थेच्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठीतील ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर यांचे अनुक्रमे रसयात्रा व प्रवासी पक्षी आणि संहिता व आदिमाया ह्या कवितासंग्रहांची श्राव्य पुस्तके संस्थेच्या संकेतस्थळावर जनतेसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यात आली आहेत. या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा व नामदेव गाथा या संतसाहित्याची बोलकी/श्राव्य पुस्तके तयार करण्यात येणार आहेत. त्यापैकी ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्य पुस्तकात रुपांतर करण्यासाठीची विहित कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(५) **मोडी लिपीतील हस्तलिखितांचे देवनागरीकरण**: तमिळ विद्यापीठ, तंजावर येथील मोडी हस्तलिखितांचे देवनागरीकरण करण्याचा प्रकल्प संस्थेने माहे मार्च २०१३ मध्ये तमिळ विद्यापीठ, तंजावर यांच्याबरोबर करार करून सुरू केलेला आहे. या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात अतिमहत्त्वाच्या ३,७६,००० एवढया मोडी हस्तलिखितांचे जतन व संवर्धन करण्यासाठी पूर्वतयारी म्हणून त्यांची साफसफाई, दुरुस्ती करून ती कागदपत्रे संगणकावर (डिजिटायजेशन) करण्यात आली आहेत. तसेच कागदपत्रांच्या विषयाप्रमाणे सुचीकरणाचे काम चालू आहे. पहिल्या टप्प्यातील दुसऱ्या भागाच्या डिजिटायजेशनचे काम पूर्ण करण्यात आले असून २,१२,५०० एवढया मोडी हस्तलिखित कागदपत्रांचे एकूण ५,०२,२४८ संगणकीकृत प्रतिमा तामिळ विद्यापीठ, तंजावर यांच्याकडून संस्थेस प्राप्त झाल्या आहेत. त्यातील तांत्रिक त्रुटी दूर करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

पहिल्या टप्प्यातील संगणकीकृत केलेल्या मोडी कागदपत्रांपैकी काही कागदपत्रे राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेत स्थळावर आस्वादक, अभ्यासक व जनतेसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

**(ई) अमराठी भाषकांसाठी उपक्रम** : अमराठी भाषकांसाठी प्रकाशने ह्या पहिल्या भागांतर्गत अमराठी भाषकांना मराठी भाषेचे ज्ञान करून देण्यासाठी पाठ्यपुस्तके, शब्दकोश इ. निर्माण करणे तसेच इतर प्रकाशने निर्माण करणे आणि दुसऱ्या भागांतर्गत दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडेल असे मराठी भाषेचे शिक्षण देणे अभिप्रेत आहे. या दृष्टीने मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने हाती घेतलेल्या "माय मराठी" प्रकल्पामध्ये राज्य मराठी विकास संस्थेने सक्रिय सहभाग घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत ६ स्तरांपैकी ५ स्तरांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आलेला असून परिचारिका तसेच रिक्षा, टॅक्सीचालक यांच्यासाठीचा लघुअभ्यासक्रमही पुर्ण करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांतर्गत पाठ्यपुस्तके,

अभ्यासपुस्तके, शब्दसंग्रह आणि संपादित/ निर्मित दृकश्राव्य सामग्री-सीडी/डीव्हीडी इत्यादी ऑफलाईन आणि ऑनलाइन सामग्री उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तयार असलेल्या अभ्यासक्रमांची सामग्री संस्थेच्या संकेतस्थळावर मुक्त (फ्री अँड ओपन सोर्स) परवान्या अंतर्गत उपलब्ध आहे. ६ व्या स्तराच्या  अभ्यासक्रमाचे कामही पूर्ण झाले असून २७ फेब्रुवारी, २०२२ रोजी त्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

**(७) मराठी दुर्मिळ ग्रंथांचे संगणकीकरण:** आजवर प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांपैकी ज्यांच्या स्वामित्व हक्काची मुदत संपली आहे, असे मराठी भाषेतील दुर्मिळ ग्रंथ आणि नियतकालिके ह्यांचे संगणकीकरण करून ते महाजालावर जनतेसाठी उपलब्ध करून देण्यात यावेत, अशी तरतूद महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार मराठी भाषा, संस्कृती, साहित्य आणि समाजजीवन ह्यासंदर्भातील ऐतिहासिक ठेवा जतन करण्याच्या हेतूने मराठीतील दुर्मिळ पुस्तके आणि नियतकालिके ह्यांचे संगणकीकरण (डिजिटायजेशन) करून ते जनतेला उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. आतापर्यंत १२९ पुस्तके व विविध नियतकालिकांचे मिळून ५५५ अंक संस्थेच्या संकेतस्थळावर (http://rmvs.marathi.gov.in/books) उतरवून घेण्यासाठी (डाऊनलोड) करून देण्यात आले आहेत.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पुर्ण झाले आहे. अशा स्वरुपाचे काम अन्य संस्था ही करत असल्याने कामाची पुनरावृत्ती टळावी हयासाठी दुसऱ्या टप्प्यांतर्गत महाराष्ट्रातील विविध शतायू ग्रंथालयांची १ कार्यशाळा संस्थेने आयोजित करुन त्यात ठरल्याप्रमाणे दुर्मिळ ग्रंथांची माहिती नोंदविण्यासाठी संस्थेच्या संकेतस्थळावर सोय करुन देण्यात आलेली होती. सार्वजनिक वाचनालय, राजगुरुनगर हया ग्रंथालयाने २५ दुर्मिळ ग्रंथांच्या संगणकीय प्रती संस्थेस दिल्या आहेत. हि सामग्री विकिकॉमन्सवर शोधसुकर स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आली असून संस्थेच्या संकेतस्थळावरही ह्या ग्रंथाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या.

**(८) विधिशास्त्र संज्ञा - संकल्पना कोश:** विधि व न्याय व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या संज्ञा - संकल्पना सर्वसामान्य जनतेस कळण्यास मदत व्हावी, हा मुख्य उद्देश असलेला विधिशास्त्र संज्ञा- संकल्पना कोश तयार करण्याचे नियोजित आहे. अधिवक्ता स्व.शांताराम दातार हे या कोशाचे प्रमुख संपादक व समन्वयक म्हणून काम करत होते. तथापि त्यांचे निधन झाल्यामुळे सदर प्रकल्प गुणवत्तापूर्ण रितीने  पूर्ण करण्यास योग्य अशा संपादकांचा शोध चालू आहे.

**(९) ऑलिम्पिक माहितीकोश:** मराठीमध्ये ऑलिम्पिक स्पर्धांविषयी माहिती देणारी पुस्तके आहेत. परंतु, माहितीकोशाच्या धर्तीवरचा एकही कोश उपलब्ध नाही. त्यामुळे शाळा-महाविद्यालये यांना उपयुक्त ठरेल असा अद्ययावत माहितीकोश तयार करण्याचे संकल्पित असून श्री. हेमंत जोगदेव हे या माहितीकोशाचे  प्रमुख संपादक असणार आहेत. या कोशाअंतर्गत एकूण पाच खंड तयार करण्यात येणार असून हा कोश ई-कोश स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**(१०) संगणक आणि मराठी:** संगणकावर मराठी साधनांचा मुक्त वापर होण्यासाठी मुक्त आणि व्यक्त स्वरुपाची साधने निर्माण करणे ओड्यासिटी ह्या ध्वनिमुद्रणांसाठी तसेच ध्वनिमुद्रित सामग्रीच्या संपादनासाठी वापरण्यात येणा-या आज्ञावलीचे मराठीकरण करण्यात येत आहे. या अंतर्गत आज्ञावलींच्या सवंदपटलांचे तसेच माहितीपुस्तिकांचे मराठीकरण करण्याचे काम चालू आहे.

त्याचप्रमाणे युनिकोड संकेत प्रणालीचा वापर करुन संगणकावर मराठीचा वापर करण्यासंदर्भात मार्गदर्शन करणा-या कार्यशाळा "युनिकोड प्रशिक्षण" ह्या प्रकल्पांतर्गत घेण्यात येत आहे. मराठी विकिपिडियासंदर्भातील कार्यशाळाही आयोजित करण्यात येतात.

**(१२) पुस्तकांचे गाव:**लोकसहभागातून साकारलेला पुस्तकांचं गाव हा नाविन्यपूर्ण प्रकल्प महाबळेश्वर जवळील भिलार या गावी कार्यन्वित करण्यात आला आहे. भिलार गावात घरे, लॉज, आणि शाळा, मंदिरे अशी सार्वजनिक ठिकाणे मिळून ३५ जागा निवडण्यात आल्या आहेत. या एकूण ३५ ठिकाणी पुस्तकांची साहित्य प्रकारनिहाय दालने ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक घरात, पर्यटकांना पुस्तके व्यवस्थित पाहता येतील, चाळता येतील आणि प्रसंगी आरामात बसून वाचता येतील अशी व्यवस्था आहे. पुस्तकांचे गाव या प्रकल्पाला भेट देणा-या वाचकप्रेमी तसेच विविध शालेय सहली यांच्यासाठी प्रकल्पांतर्गत होणा-या वाचन संस्कृतीसाठी पुरक अशा विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनासाठी खुले प्रेक्षागृह बांधण्यात आले आहे तसेच सामूहिक निवासस्थानाची सोय करण्यात आली आहे. मागील ३ वर्षात सुमारे ३.५ लाख पर्यटकांसह विविध क्षेत्रातील शेकडो मान्यवरांनी भेट देऊन गौरविले आहे.

**(१३) महाराष्ट्रातील मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन** - महाराष्ट्रातील मराठी बोलीभाषा कालांतराने व्यपगत होऊ नयेत ह्यासाठी त्या भाषांचे संगणकीय जतन, संवर्धन करण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रतिमांकन (डिजीटायझेशन) करण्याचा प्रकल्प डेक्कन कॉलेज, पुणे या अभिमत विद्यापीठाच्या सहयोगातून सुरु आहे. महाराष्ट्रातील मराठीच्या प्रादेशिक भेदांचे सर्वेक्षण आणि त्याद्वारे मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण, प्रतिमांकन आलेखन करणे असे या प्रकल्पाचे स्वरुप आहे. आतापर्यंत एकूण २९ जिल्ह्यांच्या सर्वेक्षणाव्दारे मिळालेल्या सामग्रीपैकी शब्दस्तरावरील सामग्रीच्या विश्लेषणाचे काम पूर्ण झाले आहे व ११ जिल्ह्यांचे व्याकरणीक विश्लेषणाचे काम पूर्ण झाले. दिनाक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री मराठी भाषा तसेच मा.राज्य मंत्री, मराठी भाषा ह्यांच्या उपस्थितीत सदर प्रकल्पाच्या संकेतस्थळाचे (https://sdml.ac.in/mr) लोकार्पण करण्यात आले असून सर्वेक्षणाची सामग्री आणि तिचे विश्लेषण मुक्त (फ्री अँड ओपन सोर्स) स्वरुपात संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण होत जाईल त्याप्रमाणे सामग्री सदर संकेतस्थळावर उपलब्ध होत जाणार आहे.

(१४) **समांतर पाठयपुस्तक निर्मितीसाठी अनुदान** : सुहृद मंडळ, पुणे या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, कर्णबधीर व अन्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी बालभारतीची समांतर पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या मराठी भाषेच्या पुस्तकांच्या छपाईचे काम पूर्ण झाले व महाराष्ट्रातील १७० विशेष (कर्णबधिर) शाळांना प्रत्येक विषयावर समांतर पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे.

**(१६) शिल्पकार चरित्रकोश** : सर्वसामान्य माणसापर्यंत विविध क्षेत्रातील महनीय व्यक्तींची चरित्रे पोहोचविण्यासाठी हिंदुस्थान प्रकाशन संस्थेने हाती घेतलेल्या प्रकल्पाला आर्थिक बळ देऊन हे सारे खंड पूर्ण करुन एक उत्तम प्रकल्प साकारण्याचे श्रेय राज्य मराठी विकास संस्थेला मिळणार आहे. सदर प्रकल्पांअतर्गत आठ कोश प्रकाशित झालेले असून खंड-०९ : आरोग्य हा पूर्ण झाला आहे. तसेच दृकश्राव्य स्वरुपातील काही काम झालेले आहे. सदर सामग्री ही वाचकांसाठी http://maharashtranayak.in/ या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**(१७) रंगवैखरी** : मराठी भाषा आणि साहित्य या विषयाला केंद्रभूत मानुन संस्थेने दिलेल्या विषयावर साहित्य, चित्र, शिल्प, नृत्य, संगीत या विविध कलांच्या आधारे नाट्याविष्कार सादर करायला लावणाऱ्या "रंगवैखरी" ह्या स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयीन स्तरावर २०१८ पासून करण्यात येत आहे.

**(१८) महाराष्ट्रातील मराठी भाषा व मराठी साहित्य या संदर्भात संशोधन करणाऱ्या मान्यताप्राप्त मंडळ / संस्था यांना अर्थसाहाय्य** - मराठी भाषा व साहित्य वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ व

संस्थांना रु. पाच लक्षच्या मर्यादेत अनुदान उपलब्ध करून दिले जाते. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात एकूण ३ संस्था / मंडळाना अनुदान उपलब्ध करून देण्यात आले.

**(१९) गीतार्णव शब्दार्थ संदर्भकोश** - नाथपंचकातील महत्त्वाचे कवी दासोपंत यांनी लिहिलेली टीका म्हणजेच गीतार्णव या साहित्यकृतीतील मराठी भाषेचे आणि मराठी साहित्याचे वैभव मराठी भाषिकांना कळावे व अभ्यासकांना त्याचा उपयोग व्हावा याकरिता गीतार्णव शब्दार्थ संदर्भकोश हा प्रकल्प राज्य मराठी विकास संस्थेने हाती घेतला आहे. सदर कोशाची प्रस्तावना व शब्दार्थ नोंदीचे काम पुर्ण झाले आहे.

**(२०) संस्थेचे मध्यवर्ती ग्रंथालय, बदलापूर** - मराठीतील वाड्.मयीन ठेव्याची/ ग्रंथसंपदेची व्याप्ती, मराठी भाषेचे विविध आयाम ग्रंथरूपाने दाखविणे, नवीन पिढीवर वाचन-लेखन संस्कार करणे हे संस्थेचे उद्देश असून त्यासाठी विद्यापीठीय पातळीवर अभ्यास करताना मराठी भाषा, व्याकरण, बोली, लिपी, साहित्य वाड्.मयेतिहास, संस्कृती, समाजशास्त्र इत्यादी आंतरशाखीय अभ्यासाच्या या दिशांनी संशोधन, लेखन, संपादन व्हावे त्या दृष्टीने हे ग्रंथसंग्रहालय समृद्ध आहे. ग्रंथसंग्रह ऑगस्ट, २०१९ मध्ये संस्थेच्या ताब्यात घेण्यात आला असून सदर ग्रंथ सामग्री अभ्यासकांसाठी संदर्भ वाचनालयाच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

**(२१) वऱ्हाडी बोली प्रकल्प** – वऱ्हाडी बोलीतील शब्द, म्हणी व वाक्प्रचार यांचे अर्थ विशद करणारा असा हा कोश असून त्याचे संपादन प्रा.डॉ. विठ्ठल वाघ यांनी केलेले आहे. वऱ्हाडी बोलीतील शब्दभांडार, वाक्प्रचार व म्हणी यांचा समावेश शक्य त्या प्रमाणात प्रमाण मराठी भाषेत होऊन प्रमाण मराठी भाषेचा परीघ वाढविणे, हे प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. सदर प्रकल्पाचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ (मराठी भाषा दिन) या दिवशी वऱ्हाडी बोली शब्दकोशाचे ४ खंड प्रकाशित करण्यात आले. (१) वऱ्हाडी शब्दकोश खंड १:भाग-१ (२) वऱ्हाडी शब्दकोश खंड २:भाग-२ (३) वऱ्हाडी वाक्प्रचार: खंड ३ (४) वऱ्हाडी म्हणी: खंड ४

**(२२) देवनागरी टंकाविषयी पुस्तक** – देवनागरी टंकाविषयीची तांत्रिक जाण वाढावी यासाठी आवश्यक ती माहिती पुरवणारे पुस्तक संस्थेद्वारे तयार करुन वितरीत करण्यात येणार आहे.

देवनागरी मुद्रणपरंपररा, त्यामुळे निर्माण होणारी काही वैशिष्ट्ये, देवनागरी अक्षरकारांची रचनावैशिष्ट्ये, देवनागरी टंकांची रचनावैशिष्ट्ये, टंकांचे प्रकार, टंकांचा वापर करताना लक्षात घ्यावयाची तत्वे, टंक वापरणाऱ्यांना सहाय्यभूत ठरतील असे टंकरचनेच्या प्रक्रियेतील काही मुद्दे, टंकांसंदर्भातील विविध अडचणी व त्यांच्या सोडवणूकीचे उपाय, काही समस्या, देवनागरी टंकरचनाकारांची थोडक्यात माहिती इ.मुद्यांचा य पुस्तकात समावेश असणार आहे. सदर पुस्तकाच्या लेखनाचे काम जवळपास पूर्ण झाले असून परीक्षण, मांडणी इ.प्रक्रिया पूर्ण झाल्यावर हे पुस्तक संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येईल.

**(२३) मराठी भाषेचा प्रचार- प्रसार या उपक्रमांतर्गत कार्यशाळा / उपक्रम** – मराठी भाषेच्या प्रचार-प्रसार उपक्रमांतर्गत राज्य मराठी विकास संस्थेच्या विविध विषयांवरील मार्गदर्शनपर कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१ ह्या कालावधीमध्ये एकूण बारा विविध सत्रांचे महाजालीय स्वरूपात आयोजन करण्यात आले.

राज्य मराठी विकास संस्थेची माहिती https://rmvs.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

--------------

## राज्य मराठी विकास संस्था

### कर्मचारी विषयक गोषवारा

### Personnel Summary

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी Scale of pay | पदांची संख्या | Designation |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | |
| १. | संचालक | एस-२७ : १,१८,५००-२,१४,१०० | १ | Director |
| २. | उप संचालक | एस-२७ :७८,८००-२,०९,२०० | १ | Dy. Director |
| ३. | वरिष्ठ संशोधन सहायक | एस-२५ : ६७,७००-२,०८,७०० | १ | Senior Research Assistant |
| ४. | प्रशासकीय अधिकारी | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १ | Administrative Officer |
| ५. | कनिष्ठ संशोधन सहायक | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ | Junior Research Assistant |
| ६. | लेखा अधिकारी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | १ | Accounts Officer |
| ७. | कार्यासन अधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ | Desk Officer |
| | | **एकुण (अ)** | **७** | **Total (A)** |
| | **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | |
| ८. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ | Stenographer (L.G) |
| ९. | सहायक | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ३ | Assistant |
| १०. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९,९००-६३२०० | २ | Clerk-Typist |
| ११. | रोखपाल | एस-६ : १९,९००-६३२०० | १ | Cashier |
| १२. | वाहन चालक | एस-६ : १९,९००-६३२०० | १ | Driver |
| | | **एकुण (ब)** | **८** | **Total (B)** |
| | **(क) वर्ग ड (C) Class D** | | | |
| १३. | शिपाई | एस-१ : १५,०००-४७,६०० | १ | Peon |
| | | **एकूण (क)** | **१** | **Total (C)** |
| | | **एकूण (अ + ब + क)** | **१६** | **Grand Total (A+B+C)** |

## कार्यक्रम क्रमांक-५

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मराठी साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक १९ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृती विषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते.

**मंडळाचे मुख्य उद्दिष्ट**

महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती आणि इतिहास यांसारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. सदर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ मौलिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे. साहित्य संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरूप असे मौलिक ग्रंथ स्वस्त किंमतीत मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्यावर मंडळाने लक्ष केंद्रित केले आहे. मंडळाच्या साहित्य संवर्धनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मंडळामार्फत खालील योजना/उपक्रम राबविले जातात.

*** महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या प्रमुख योजनांची सविस्तर माहिती**

**(१) मंडळाचा पुस्तक प्रकाशन उपक्रम:** खाजगी प्रकाशकांमार्फत साधारणत: जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच सामान्य वाचकास कमी किंमतीत उपलब्ध करुन देण्याची ही योजना आहे. सदर योजनेमध्ये वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक इत्यादि विषयांवरील ग्रंथ प्रकाशित केले जातात. तसेच मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे मागणीनुसार पुर्नमुद्रणही केले जाते. सदर योजनेअंतर्गत आतापर्यंत ५९२ पुस्तके प्रकाशित केली आहेत.

**(२) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान :**या योजनेअंतर्गत मराठीतील वैचारिक विषयावरील वैशिष्ट्यपूर्ण संशोधनात्मक अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा तसेच ललित साहित्यातील वाङ्.मयीन दृष्टीने गुणवत्तापूर्ण असलेल्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

**(३) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान :** या योजनेअंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा नवलेखकांना कथा, कादंबरी, ललित गद्य, काव्य नाट्य (एकांकिका) व बालवाङमय या लेखनाच्या प्रकाशनासाठी मंडळाकडून अनुदान दिले जाते. आतापर्यंत सदर योजनेअंतर्गत २३११ नवलेखकांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**(४) नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळांना अनुदान :** नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची १० चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात. मंडळाकडून महाराष्ट्रभर आजमिती पर्यंत १११ चर्चासत्रे/कार्यशाळा यांचे आयोजन झाले आहे.

**(५) साहित्य संस्थांना अनुदान :** या अनुदान योजनेअंतर्गत शासनामार्फत १९८९-९० सालापासून मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी (१) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ (२) विदर्भ साहित्य संघ, नागपूर (३) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद (४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई (६) कोकण मराठी

साहित्य परिषद, रत्नागिरी आणि (७) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर  अशा ७ संस्थांना दरवर्षी दिल्या जाणाऱ्या रु. ५.०० लाख इतक्या अनुदानात वाढ करुन सन २०१८-१९ पासून  प्रत्येकी रु.१०.०० लाख  इतके अनुदान देण्यात येत आहे.

**(६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान :**अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळामार्फत दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. या संमेलनासाठी दरवर्षी रु.२५.०० लाख इतके अनुदान देण्यात येत होते. सन २०१८-१९ पासून सदर अनुदानाच्या रकमेत वाढ करुन रु.५०.०० लाख इतके अनुदान देण्यात येत आहे.

**(७) नियतकालिकांना अनुदान** : विविध विषयांवरील मराठी भाषेत प्रसिध्द होणाऱ्या दर्जेदार व निकषास पात्र ठरणाऱ्या अशा सर्वसाधारणपणे ५८  नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान वितरित केले जाते.

**(८) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना**: सन २०१२ पासून यामध्ये अ) प्रौढ वाड्.मय विभागात २२ वाङ्मय पुरस्कार, ब) बालवाड्.मय विभागात ६ पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात ६ पुरस्कार व ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार १ असे एकूण ३५ राज्य वाड्.मय पुरस्कार दरवर्षी मराठी भाषा गौरवदिनी प्रदान केले जातात.

सन २०२० चा स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ:मय पुरस्कार ३१ साहित्यिक/लेखकांना प्रदान करण्यात आला आहे.

**(९) ज्येष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार:** मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकास ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार मंडळाच्या वतीने सन २०१२-१३ पासून प्रदान करण्यात येत आहे. . या पुरस्काराचे स्वरूप रु.५,००,०००/- (रुपये पाच लक्ष फक्त), मानचिन्ह व मानपत्र असे आहे. **सन २०२१ या वर्षाचा विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार श्री.भारत सासणे यांना प्रदान करण्यात आला आहे.**

**(१०) श्री. पु. भागवत पुरस्कार** : साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री. पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप रु.३,००,०००/- (रुपये तीन लक्ष फक्त), मानचिन्ह व मानपत्र असे आहे. सन २०२१ या वर्षीचा श्री.पु.भागवत पुरस्कार जोकवाड्.मय गृह, मुंबई या संस्थेस प्रदान करण्यात आला आहे.

**(११) अन्य मराठी साहित्य संमेलनाना अनुदान** : महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१० नुसार अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळामार्फत दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या अखिल भारतीय मराठी  साहित्य संमेलनास रु.५०.००/- लाख इतके अनुदान दिले जाते. या मुख्य साहित्य संमेलनाप्रमाणे मुख्य मानल्या गेलेल्या प्रवाहापेक्षा वेगळया प्रवाहातील जनसमुहांच्या आणि उपेक्षित वर्गांच्या राज्यामध्ये आयोजित होणाऱ्या अन्य  मराठी साहित्य संमेलनांना प्रत्येकी दरवर्षी रु.२.०० लाखाचे अनुदान देण्यात येते.

**(१२) बृहद्ग्रंथांचे प्रकल्प योजना** : मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.सासंमं-२०१६/प्र.क्र.६०/२०१६/भाषा-३, दिनांक १३.०५.२०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने बृहद्ग्रंथ प्रकल्प योजना राबविण्यात येते. महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथनिर्मिती करणे हे मंढळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषंयावर वैचारिक, सामाजिक, समीक्षात्मक,चरित्रात्मक वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्त्वपूर्ण, नाविन्यपूर्ण व दुर्मिळ स्वरुपाचे बृहद्ग्रंथ प्रकल्प हाती घेण्यात येऊन प्रकाशित करण्यात येतात.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची  माहिती https://sahitya.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

## कर्मचारी विषयक गोषवारा

## Personnel Summary

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी SCALE OF PAY (३) | पदांची संख्या (४) | DESIGNATION (५) |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित** (A) Gazetted | | | | |
| १. | सचिव | एस-२३ : ६७७००-२०८७०० | १ | Secretary |
| २. | सहायक लेखा अधिकारी | एस-१५ ४१८००- १३२३०० | १ | Assistant Account Officer |
| | | **एकूण (अ)** | **२** | Total (A) |
| **(ब) अराजपत्रित** (B) Non-Gazetted | | | | |
| ३. | अधीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Superintendent |
| ४. | प्रपाठक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Reader |
| ५. | उच्चश्रेणी लघुलेखक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Stenographrr (H.G.) |
| ६. | अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक (निम्नश्रेणी लघुलेखक) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | P.A. to Chairman [Stenographer (L.G.)] |
| ७. | वरिष्ठ लिपीक | एस-८ : २५५००-८११०० | ४ | Senior Clerk |
| ८. | ग्रंथालयीन सहाय्यक | एस- ७ : २१७००-६९१०० | १ | Assistant Librarian |
| १० | लिपिक-टंकलेखक | एस- ६ : १९९००-६३२०० | ७ | Clerk-Typist |
| ११ | वाहनचालक | एस- ६ : १९९००-६३२०० | १ | Driver |
| | | **एकूण (क)** | **१७** | Total (B) |
| **(क) वर्ग ड** (C) Class D | | | | |
| १२. | शिपाई | एस- १ : १५०००-४७६०० | २ | Peon |
| | | **एकूण (ड)** | **२** | Total (C) |
| | | **एकूण (अ + ब + क)** | **२१** | Total (A+B+C) |

## कार्यक्रम क्रमांक ६

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी राज्यकारभारासंबंधी मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रे सांगितली. त्या सूत्रांनुसार मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी राज्य शासनाने दिनांक १९ नोव्हेंबर, १९६० रोजी कै.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. या मंडळाने जे अनेकविध उपक्रम सुरु केले, त्यापैकी एक प्रमुख व वैशिष्टयपूर्ण उपक्रम म्हणजे मराठी विश्वकोशाची निर्मिती हा होय.

दिनांक ०१ डिसेंबर, १९८० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन मराठी विश्वकोशाच्या संपादन व प्रकाशन कार्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या राज्यस्तरीय मंडळाची स्थापना झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर (दिनांक २४ मे, १९९४) प्रा. मे. पु. रेगे, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. श्रीकांत जिचकार, डॉ. विजया वाड व श्री.दिलीप करंबेळकर यांनी विश्वकोशाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक म्हणून काम पाहिले आहे. डॉ. श्रीधर तथा राजा दिक्षित यांनी दिनांक ०१ जून, २०२१ पासून मंडळाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्विकारला आहे.

मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश आहे. त्यात मानव्य व विज्ञान आणि तंत्रज्ञानातील मुलभूत ज्ञानशाखांतील माहिती नोंदींच्या/लेखांच्या रुपाने प्रकाशित करण्यात आली आहे. मराठी विश्वकोशाचे १ ते २० खंड वर्णानुक्रमाने (अ ते ज्ञ) प्रकाशित झाले आहेत.

**मराठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरण :** कालौघानुसार सर्व विषय व ज्ञानशाखांमध्ये झालेले बदल व वाढ यांमुळे विश्वकोशातील अनेक नोंदीमध्ये सुधारणा तसेच काही अतिरिक्त नोंदी समाविष्ट करणे व नोंदीचे अद्ययावतीकरण करणे हे काम कालमर्यादेत करणे आवश्यक असून सदर काम जलद गतीने जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञानाची मदत घेऊन सर्व ज्ञानशाखांतील नोंदी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरिता विविध विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था इत्यादिंच्या सहकार्याने ज्ञानमंडळे स्थापन करुन त्यांच्या माध्यमातून मराठी विश्वकोशातील नोंदी अद्ययावत करण्याचे तसेच नवीन नोंदी समाविष्ट करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत विविध विषयांची ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे नियोजन असून यापैकी ४५ ज्ञानमंडळे स्थापन होऊन त्यांचे काम सुरु झाले आहे.

मराठी विश्वकोशाचे संपादन कार्य हे विज्ञान व तंत्रविज्ञा, मानव्यविद्या, कला आणि प्रशासन अशा ४ शाखांमध्ये विभागलेले आहे. ज्ञानविज्ञानाच्या सर्वच शाखांमध्ये कायमस्वरुपी तज्ज्ञ संपादन नेमणे शक्य नसल्याने विविध शाखांतील तज्ज्ञांच्या सवडीनुसार अभ्यागत संपादक म्हणून त्यांचे सहकार्य उपलब्ध करुन घेण्यात येते. वाई, जिल्हा सातारा येथे विश्वकोशाचे अद्ययावत ग्रंथालय असून त्यामध्ये सुमारे ५० हजारांहून अधिक संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत.

**विक्रीस उपलब्ध असलेली प्रकाशने :**

| | पुस्तकाचे/सीडीचे नाव | मूळ किंमत (रु.) | सवलतीची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १) | मराठी विश्वकोश खंड | २५०/- | १७५/- |
| २) | १ ते १७ खंडांच्या ६ सीडींचा संच | १०००/- | ७००/- |
| ३) | कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) | ५००/- | ३५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | खंड-२ भाग-१ | | |
| ४) | कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-२ भाग-२ | ५००/- | ३५०/- |
| ५) | मराठी-विश्वकोश १ ते २० खंड कार्ड- पेनड्राईव्ह | ८००/- | -- |

६) विश्वकोशाचे सर्व खंड मोबाईल ॲपच्या स्वरुपात उपलब्ध

"मराठी विश्वकोश" हे भ्रमणध्वनी ॲप अनन्या मल्टिटेक प्रा.लि. या कंपनीकडून विकसित करण्यात आले असून त्याद्वारे विश्वकोशाच्या १ ते २० खंडातील सर्व नोंदी भ्रमणध्वनीवर आता एका क्लीकवर मोफत उपलब्ध करुन दिल्या आहेत. हे उपयोजक गुगल प्ले स्टोअरवर सहजरित्या उपलब्ध आहे.

**मंडळाचे आगामी उपक्रम :**

१) मराठी विश्वकोशाचे सातत्याने अद्ययावतीकरण व प्रकाशन.

२) मराठी विश्वकोश खंड १ ते २० मध्ये आलेला आक्षेपार्ह मजकूर काढून टाकणे तसेच किरकोळ दुरुस्त्या करुन नवीन सुधारित दुसरी आवृत्ती छपाई करणे.

३) कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) भाग-४ चे संपादन व प्रकाशन

४) कुमार विश्वकोश १ ते १२ खंडांचे संपादन व प्रकाशन

५) मराठी विश्वकोश खंडांचे मुद्रण-विश्वकोश लेखन, समीक्षण, संपादन व प्रकाशनासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर.

६) विश्वकोश वार्षिक अहवाल २०२१-२२.

७) विश्वकोश ज्ञानमंडळे - पुरस्कार सोबत.

८) विविध विद्यापीठे / नामांकित संस्था भेटी / दौरे (विश्वकोश प्रचार प्रसार).

९) आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सभेत विश्वकोश सहभाग (विश्वकोश प्रचार प्रसार)

१०) वाई येथे व संबंध महाराष्ट्रात वाचन प्रेरणा दिन सादरीकरण.

११) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरीकरण.

१२) कुमार विश्वकोश खंड २ भाग-३, दृकश्राव्य स्वरुपात व पुस्तक स्वरुपात तयार करणे.

१३ बालकोश नियोजनाची कामे

महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाची माहिती https://marathivishwakosh.org/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

---------------------------

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

## कर्मचारी विषयक गोषवारा

Personnel Summary

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (SCALE OF PAY) | पदांची संख्या | DESIGNATION |
|---|---|---|---|---|
| | **(१) प्रशासकीय कार्यालय, मुंबई** (१) Administative Office, Mumbai | | | |
| **(अ) राजपत्रित** (A) Gazetted | | | | |
| १. | सचिव | एस-२३ : ६७७००-२०८७०० | १ | Secretary |
| २ | सहाय्यक लेखाधिकारी | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Account Officer |
| **(ब) अराजपत्रित** (B) Non-Gazetted | | | | |
| ३. | अधिक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Superintendent |
| ४. | निम्नश्रेणी लघुलेखक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | २ | Lower Grade Stenographer |
| ५. | विद्याव्यासंगी सहायक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Vidya Vyasangi Assistant |
| ६. | वरिष्ठ लिपीक | एस-८ : २५५००-८११०० | २ | Senior Clerk |
| ७. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Clerk-Typist |
| ८. | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | १ | Driver |
| **(क) वर्ग ड** (C) Class D | | | | |
| ९. | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | २ | Peon |
| | **एकूण (१)** | | **१३** | Total **(1)** |
| | **(२) वाई कार्यालय** (२) Wai Office | | | |
| **(अ) राजपत्रित** (A) Gazetted | | | | |
| १. | सहायक सचिव | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Secretary |
| **(ब) अराजपत्रित** (B) Non-Gazetted | | | | |
| २. | विद्याव्यासंगी सहायक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ७ | Vidya Vyasangi Assistant |
| ३. | संपादकीय सहायक | एस-१० : २९२००-९२३०० | ७ | Editorial Assistant |
| ४. | ग्रंथालयीन सहायक | एस-७ : २१७००-६९१०० | २ | Library Assistant |
| ५. | लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) | एस-६ : १९९००-६३२०० | ५ | Clerk-Typist |
| **(क) वर्ग ड** (C) Class D | | | | |
| ६. | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | ४ | Peon |
| ७. | झाडूवाला हमाल | एस-१ : १५०००-४७६०० | १ | Sweeper-Cum-Hamal |
| | **एकूण (२)** | | **२७** | Total (2) |
| | **(३) ठोक मासिक मानधन** (३) Gross Monthly Honorarium | | | |
| १. | विभाग संपादक | २१००० | २ | Section Editor |
| २. | सहसंपादक | १४००० | २ | Joint Editor |
| ३. | कला संपादक | ११००० | १ | Art Editor |
| | **एकूण (३)** | | **५** | Total (3) |
| | **एकूण (१ + २ + ३)** | | **४५** | Total (1 + 2 + 3) |